७० वर्षे
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

शुक्रवार, दि. ०५ जून २०२६

www.dainikesandhya.com
www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १६० | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रुपये


# जय पवारांना ‘कर्ज’ नाही तर ‘अॅडव्हान्स’ दिला

## बंगला खरेदीसाठी मागील वर्षी केलेला व्यवहार, विक्रम काकडेंचा खुलासा

**मुंबई (दै. संध्या)**



पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषदेसाठी महायुतीची उमेदवारी मिळाल्यापासून चर्चेत असलेले विक्रम काकडे आता एका वेगळ्या कारणामुळे चर्चेत आले आहेत. काकडे यांनी अजित पवार यांचे पुत्र जय पवार यांना १० कोटी रुपयांचे कर्ज दिल्याची माहिती नुकतीच समोर आली होती. मात्र, "ते कर्ज नसून बंगला खरेदी करण्यासाठी दिलेली आगाऊ रक्कम आहे," असा महत्त्वपूर्ण खुलासा खुद्द विक्रम काकडे यांनी केला आहे.

विक्रम काकडे यांच्या संपत्तीच्या विवरणपत्रात जय पवार यांच्या नावावर १० कोटी रुपये दाखवण्यात आल्याने राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली होती. यावर स्पष्टीकरण देताना काकडे म्हणाले की, "मी जय पवार यांना कोणतेही कर्ज दिलेले नाही. प्रतिज्ञापत्रात 'लोन्स अँड अॅडव्हान्सेस' असा उल्लेख आहे. तो व्यवहार एका मालमत्तेसंदर्भात आहे. माझे सध्याचे घर यशवंत गाडगे नगरमधील बंगला क्रमांक ९ आहे आणि त्या शेजारील १० क्रमांकाचा बंगला जय पवार यांच्या नावावर आहे. तो प्लॉट मला स्वतःला राहण्यासाठी खरेदी करायचा असल्याने हा व्यवहार झाला आहे." हा व्यवहार मागील वर्षीच झाला असून त्याचा सध्याच्या निवडणुकीशी कोणताही संबंध नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. अजित पवार यांच्याकडे हा बंगला घेण्याची इच्छा व्यक्त केल्यानंतर, तो जय पवार यांच्या मालकीचा असल्याने त्यांच्यासोबत हा व्यवहार करून ही आगाऊ रक्कम दिल्याचे विक्रम काकडे यांनी सांगितले. पुणे विधान परिषदेसाठी माजी आमदार सुनील टिंगरे इच्छुक होते, मात्र त्यांना डावलून काकडेंना उमेदवारी मिळाल्याने पक्षात नाराजी असल्याच्या चर्चा होत्या. यावर बोलताना काकडे म्हणाले, "निवडणुकीची घोषणा झाल्यावर जोपर्यंत अधिकृत उमेदवार घोषित होत नाही, तोपर्यंत काही प्रमाणात सगळे लोक उमेदवारी मिळवण्यासाठी प्रयत्न करत असतात. पण एकदा उमेदवार जाहीर झाला की, पक्षांतर्गत असलेली सगळी नाराजी संपून जाते. तरी सुद्धा जे इच्छुक उमेदवार होते, त्यांच्या सगळ्यांची मी काल भेट घेतली. सगळ्यांशी बोलताना त्यातील कुणी नाराज असल्याचे मला वाटले नाही." निवडणुकीच्या गणितावर भाष्य करताना विक्रम काकडे यांनी विजयाचा ठाम विश्वास व्यक्त केला. ते म्हणाले, "महाविकास आघाडीने जर माघार घेतली नाही, तर तशीही आम्ही निवडणुकीची तयारी केलेली आहे. मताधिक्य आमच्याकडे बऱ्यापैकी जास्त आहे. जवळपास ९५ टक्के मते ही महायुतीची आहेत. मी महायुतीचा अधिकृत उमेदवार असल्यामुळे ती सर्व मते मला पडतील, अशी खात्री आहे.

### अपक्ष उमेदवारही माघार घेतील

संजय कंद आणि प्रदीप कणसे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केलेला आहे. दोघांनीही नुकतीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. आज उमेदवारी अर्ज माघारी घेण्याचा शेवटचा दिवस आहे. त्यामुळे ते माघार घेतील का? याबाबत विक्रम काकडे यांनी विचारले असता ते म्हणाले, संजय कंद हे माघार घेतील, असा विश्वास विक्रम काकडे यांनी व्यक्त केला.

# काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनंतराव थोपटे यांचं निधन


**पुणे (दै. संध्या)**



राज्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अनंतराव थोपटे यांचं निधन झालं आहे. वयाच्या 93 व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला आहे. पुण्यातील दिनानाथ मंगेशकर रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते. उपचारादरम्यान, अल्पशा आजाराने त्यांचं निधन झालं आहे. त्यांच्या निधनाने राजकीय सामाजिक क्षेत्रातून हळहळ व्यक्त केली जात आहे. अनंतराव थोपटे हे पुण्यातील भोर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार होते. तसेच भोर विधानसभा मतदारसंघाचे त्यांनी अनेक वर्षे नेतृत्व केले होते. अनंतराव थोपटे अनेक वर्षे राज्य मंत्री मंडळात कॅबिनेट मंत्री होते. तसेच ते पुण्याचे पालकमंत्री देखील राहिले होते. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या स्थापनेनंतर थोपटे काँग्रेसचे विधीमंडळातील गटनेते होते. पुणे जिल्ह्यात काँग्रेस पक्ष वाढण्यात थोपटे यांचे मोठे योगदान होते. माजी आमदार आणि भाजपचे नेते संग्राम थोपटे यांचे ते वडिल होते. पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील राजकारणात थोपटे घराण्याचे नाव मोठे आहे. अनंतराव थोपटे यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत अनेक वर्षे या मतदारसंघाचे नेतृत्त्व केले होते. त्यांनी एकूण 14 वर्षं मंत्रिपद भूषवलेलं होते. ते एकूण 6 वेळा भोर मतदारसंघाचे आमदार राहिले. आपल्या मंत्रिपदाच्या कार्यकाळात त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. काँग्रेस पक्षातही त्यांच्या शब्दाला मोठा मान होता. अनंतराव थोपटे यांचे चिरंजीव संग्राम थोपटे सध्या राज्याच्या राजकारणात सक्रीय आहेत.

# उद्धव ठाकरेंना पुन्हा पक्षात बंडखोरीची भीती

**मुंबई (दै. संध्या)**



राज्यात विधान परिषदेची रणधुमाळी सुरू आहे. आज निवडणुकीतून अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता. विधान परिषद निवडणुकीमध्ये महायुतीमध्ये मोठ्या प्रमाणात बंडखोरी झाल्याचं पहायला मिळालं, परंतु शेवटच्या क्षणी ही बंडखोरी मोडून काढण्यात महायुतीला मोठं यश मिळालं आहे. तर दुसरीकडे महाविकास आघाडीला दोन जागांवर मात्र मोठा धक्का बसला आहे. ऐनवेळी उमेदवारांनी पक्ष नेतृत्वाला विश्वासात न घेताच निवडणुकीतून माघार घेतली आहे. रत्नागिरी-सिंधुदुर्ग विधान परिषद मतदारसंघातून शिवसेना ठाकरे गटानं बाळ माने यांना उमेदवारी जाहीर केली होती परंतु त्यांनी ऐनवेळी निवडणुकीतून माघार घेतली. तसेच छत्रपती संभाजीनगर -जालना विधान परिषद मतदारसंघातून महाविकास आघाडीकडून शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या देवयानी डोनगावकर यांना उमेदवारी देण्यात आली होती, त्यांनी देखील या निवडणुकीतून माघार घेतली आहे. दरम्यान त्यानंतर जळगावमध्ये अशी स्थिती होऊ नये, उमेदवाराने माघार घेऊ नये म्हणून जळगावमधील विधान परिषद निवडणुकीतील शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवाराला थेट मुंबईत बोलवून घेण्यात आलं होतं, अशी माहिती समोर आली आहे. जळगाव विधान परिषदेच्या निवडणुकीमध्ये शिवसेना ठाकरे गटाकडून खबरदारी घेत उमेदवार शरद तायडे यांना थेट मुंबईत बोलवून घेण्यात आले. उमेदवाराने माघार घेऊ नये, यासाठी शिवसेना ठाकरे गटाचे संपर्कप्रमुख संजय सावंत यांच्या माध्यमातून शरद तायडे यांना मुंबईत बोलावून घेण्यात आले होते. सत्ताधाऱ्यांकडून दबाव व माघारीचा संभाव्य धोका लक्षात घेत शिवसेना ठाकरे गटाकडून उमेदवाराला मुंबईत बोलवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

# डेडलाईन देऊन गडकरी फसले : मुंबई-गोवा महामार्गाचं काम अपूर्णच

### टोल वसुलीमुळे कोकणवासीयांचा संताप उफाळला

**मुंबई (दै. संध्या)**



कोकणवासीयांच्या संयमाची परीक्षा घेणाऱ्या मुंबई-गोवा महामार्गाच्या रुंदीकरणाबाबत एक अत्यंत निराशाजनक चित्र पुन्हा एकदा समोर आलं आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी महामार्ग पूर्ण करण्यासाठी दिलेली 31 मे ची डेडलाईन पूर्णपणे अपयशी ठरली आहे. यंदाच्या पावसाळ्यापूर्वी हा महामार्ग पूर्ण होईल, असं आश्वासन गडकरी यांनी दिलं होते. मात्र, प्रत्यक्षात जून महिना सुरू झाला तरी महामार्गाचं काम अनेक ठिकाणी अर्धवट स्थितीत रखडलं आहे.

महामार्गाचं काम पूर्ण झालेलं नसतानाही राष्ट्रीय महामार्ग विभागाने या मार्गावर टोल वसुली सुरू केल्यामुळे प्रवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. नितीन गडकरी यांनी माजी खासदार नारायण राणे यांच्या सिंधुदुर्गातील वाढदिवस अभिष्टचिंतन सोहळ्यात ही डेडलाईन दिली होती. मात्र, ही डेडलाईन हुकल्यामुळे कोकणकरांना यंदाचा पावसाळा देखील याच खडतर आणि खड्डेमय महामार्गावरून प्रवास करत घालवावा लागणार असल्याचं स्पष्ट झालं आहे.

या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम तब्बल 2011 म्हणजेच मागील 15 वर्षांपासून सुरू आहे. या दीर्घ काळात अनेक नामांकित कंपन्यांनी या महामार्गावरील कामात आपली यंत्रणा लावली, कंत्राटदार बदलले, मात्र अजूनही हा महामार्ग पूर्ण होण्याचे नाव घेत नाही. महामार्ग पूर्ण होण्याआधीच खारपाडा येथे पहिला टोल सुरू करून प्रवाशांची लूट सुरू करण्यात आली आहे. या टोल वसुलीला कोकणकरांनी कडाडून विरोध केला होता, मात्र प्रशासनाने नागरिकांचा विरोध डावलून खारपाडा टोल सुरूच ठेवला आहे.

महामार्गाच्या रखडलेल्या कामाचा सर्वाधिक फटका रायगड जिल्ह्यातील वाहतुकीला बसत आहे. या भागातील अपूर्ण कामांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे:

बायपासचे काम अपूर्ण : रायगड जिल्ह्यातील अत्यंत महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या माणगाव आणि इंदापूर या दोन्ही बायपासचे काम अजूनही पूर्ण झालेले नाही.

उड्डाणपूल आणि सर्व्हिस रस्ते : कोलाड जवळील उड्डाणपुलाचे काम रखडलेलं आहे. याशिवाय उड्डाणपुलांखालील गावांना जोडणारे सर्व्हिस रस्ते आणि अनेक भागांतील अंतर्गत रस्ते अजूनही अपूर्ण अवस्थेत आहेत.

10 किमीचे काम प्रलंबित : माणगाव आणि इंदापूर या दोन्ही बायपास मिळून साधारण 10 किलोमीटर अंतराचे मुख्य काम अद्यापही बाकी आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये मुंबई-गोवा महामार्गाचे एकूण 140 किलोमीटरचे जाळे पसरलेले आहे. अधिकृत आकडेवारीनुसार, सद्यस्थितीत रायगड भागात केवळ 70 टक्के काम पूर्ण झाले असून 30 टक्के काम अजूनही प्रलंबित आहे. अनेक भागांत एकेरी वाहतूक सुरू असल्याने अपघातांचा धोका वाढला आहे.

महामार्गावर उड्डाणपूल, सर्व्हिस रस्ते आणि महत्त्वाचे बायपास अपूर्ण असताना मंत्री महोदयांनी कोणत्या आधारावर 31 मे ची डेडलाईन दिली होती? असा संतप्त सवाल आता कोकणचे प्रवासी आणि स्थानिक नागरिक करत आहेत.

दरवर्षी पावसाळ्यापूर्वी केवळ आश्वासनांची खैरात केली जाते, मात्र प्रत्यक्ष जमिनीवर परिस्थिती बदलत नाही, अशी भावना प्रवाशांमध्ये निर्माण झाली आहे. जून महिना सुरू झाल्याने आता पावसाळा तोंडावर आला आहे.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
e-paper www.sandhyaepaper.com


## ढिंग-टांग

हजारवेळा सांगितले की पक्षाच्या पराभवाविषयी रस्त्यात चिंतन करू नका... आणि डोळे मिटून तर अजिबातच नको.



# १२ ठिकाणी महायुती आणि मविआ आमने सामने, नाशिकमध्ये नरेंद्र दराडे आणि गोकुळ गीते आमने सामने

# विधानपरिषदेच्या १७ पैकी ५ जागा बिनविरोध

**मुंबई (दै. संध्या)**



महाराष्ट्राच्या विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज संस्था मतदारसंघाच्या 17 जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरु आहे. उमेदवारी अर्ज मागं घेण्याच्या दिवशी राज्यभरात मोठ्या घडामोडी पाहायला मिळाल्या. राज्यातील सत्ताधारी महायुतीच्या उमेदवारांसमोर महाविकास आघाडीनं आव्हान उभं करण्याचा प्रयत्न केला. मात्र, मविआच्या काही उमेदवारांनी संख्याबळाचं कारण, मित्रपक्षांचं सहकार्य मिळत नसल्याचा आरोप करत माघार घेतली. तर, महायुतीच्या नेत्यांना देखील बंडखोरांना शांत करण्यात यश आलं. नितेश राणे थेट ठाकरेंच्या शिवसेनेचे कोकण विधानपरिषदेचे उमेदवार बाळ माने यांना अर्ज मागं घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाले. तर, नाशिकमध्ये गोकुळ गीते अर्ज माघारीवरुन चर्चेत राहिले, तर गणेश गीते यांनी सकाळीच अर्ज मागं घेणार असल्याचं स्पष्ट केलं. अर्ज माघारीच्या दिवशी पाच जागा बिनविरोध झाल्या, यात दोन शिवसेना, दोन राष्ट्रवादी काँग्रेस आणि एका जागेवर भाजपनं बिनविरोध विजय मिळवला.

रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग : रायगडमध्ये महायुतीच्या जागावाटपात ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसकडे आहे. या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेसनं अनिकेत तटकरे यांना उमेदवारी दिली आहे. ठाकरेंच्या शिवसेनेकडून बाळ माने यांना उमेदवारी देण्यात आली होती. मात्र, बाळ माने मंत्री नितेश राणे यांच्यासोबत जिल्हाधिकारी कार्यालयात आले आणि त्यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला. शेकापच्या अरविंद म्हात्रे यांच्याकडून अर्ज मागं घेण्यात आला. पक्षविरोधी कारवाईमुळं बाळ मानेंची ठाकरेंच्या सेनेतून हकालपट्टी केल्याचं संजय राऊत यांनी जाहीर केलं. या मतदारसंघात अनिकेत तटकरे बिनविरोध विजयी झाले.

पुणे : पुणे स्थानिक स्वराज संस्था मतदारसंघातून आज राष्ट्रवादीचे सुनील टिंगरे, भाजपचे बंडखोर उमेदवार प्रदीप कंद यांनी माघार घेतली. तर, महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे श्रीकांत पाटील यांनी माघार घेतल्यानं विक्रम काकडेंच्या बिनविरोध विजयाचा मार्ग सुकर झाला. पुण्यात राष्ट्रवादीचे विक्रम काकडे बिनविरोध विजयी झाले.

अहिल्यानगर : अहिल्यानगरमध्ये काँग्रेसच्या पाठिंब्यावर करण ससाने यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता, तो देखील त्यांनी मागे घेतला आहे. प्राजक्त तनपुरे यांच्या विरोधात अपक्ष उमेदवार दत्तात्रय पानसरे यांचा उमेदवारी अर्ज बाकी होता. शहाबाज सय्यद यांनी दत्तात्रय पानसरेंचा अर्ज मागं घेतल्याचं समोर आलं. दत्तात्रय पानसरे यांनी अर्ज मागे घेतला नसल्याचं म्हटलं.

ठाणे: ठाण्यात एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे रवींद्र फाटक उमेदवार आहेत. त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाकडून अभिजीत पवार यांना उमेदवारी देण्यात आलेली मात्र त्यांनी देखील माघार घेतली. रवींद्र फाटक बिनविरोध विजयी झाले.

नाशिक : नाशिक स्थानिक स्वराज संस्था मतदारसंघ अर्ज मागं घेण्याच्या दिवशी चर्चेत राहिला. हा मतदारसंघ एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेकडे असून तिथून नरेंद्र दराडे उमेदवार आहेत. भाजपच्या गणेश गीते यांनी उमेदवारी अर्ज मागं घेतला. मात्र, गोकुळ गीते यांनी अर्ज कायम ठेवला. यामुळं या ठिकाणी नरेंद्र दराडे विरुद्ध गोकुळ गीते अशी लढत होईल.

यवतमाळ : यवतमाळ स्थानिक स्वराज संस्था मतदारसंघासाठी काँग्रेसनं उमेदवारी दिलेल्या साहेबराव कांबळे यांनी काल माघार घेतली. त्यामुळं मविआकडून सय्यद फारूख यांना पाठिंबा देण्याबाबत विचार सुरु होता. मात्र, सय्यद फारुख यांनी अर्ज मागं घेतला. या मतदारसंघातून दुष्यंत चतुर्वेदी बिनविरोध विजयी झाले.

सांगली सातारा : शिवसेनेच्या तानाजीराव पाटील यांनी एकनाथ शिंदे यांच्या आदेशानं शंभूराज देसाई यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज मागं घेतला. या ठिकाणी धैर्यशील कदम आणि अभयसिंह जगताप अशी लढत होईल.

नागपूर- नागपूरमध्ये काँग्रेसचे दुसरे क्रमांकावर असलेले उमेदवार दिनेश ढोले, शेकापचे अपक्ष उमेदवार सुरेंद्र लोही, राजेंद्र जंगले यांनी उमेदवारी अर्ज मागं घेतला आहे. या ठिकाणी अतुल लोंढे यांच्या विरोधात महायुतीचे डॉ. राजीव पोतदार असतील.

सोलापूर : सोलापूर विधानपरिषदेच्या निवडणुकीतून आमदार उत्तम जानकर यांचे पुत्र जीवन जानकर यांनी माघार घेतली. सोलापूर विधानपरिषदेत भाजपचे राजेंद्र राऊत, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे वसंतराव देशमुख या दोघांचेच अर्ज आहेत. नागेश अक्कलकोटे यांचा निर्णय स्पष्ट झाला नव्हता.

नांदेड : महायुतीला नांदेडमध्ये देखील बंड शमवण्यात यश आलं. नांदेडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे पुत्र प्रवीण पाटील चिखलीकर यांनी माघार घेतली. याठिकाणी काँग्रेसचे रामदास पाटील विरुद्ध भाजप महायुतीचे अमर राजूरकर

भंडारा-गोंदिया : राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे भंडारा जिल्हा परिषदेचे शिक्षण सभापती नरेश ईश्वरकर यांची उमेदवारी कायम आहे. या मतदारसंघातून काँग्रेस पक्षाचे उमेदवार दिलीप बनसोड यांच्यासह काँग्रेसचे बंडखोर प्रफुल अग्रवाल यांनी उमेदवारी मागे घेतली.

### बिनविरोध विजयी उमेदवार

1. वर्धा-गडचिरोली-चंद्रपूर : अरुण लखाणी, भाजप
2. पुणे: विक्रम काकडे , राष्ट्रवादी काँग्रेस
3. ठाणे :रवींद्र फाटक , शिवसेना
4. रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग : अनिकेत तटकरे, राष्ट्रवादी काँग्रेस
5. यवतमाळ : दुष्यंत चतुर्वेदी, शिवसेना

### राज्यातील १२ मतदारसंघातील प्रमुख लढती

1. सोलापूर : राजेंद्र राऊत (भाजप) विरुद्ध वसंतराव देशमुख (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार)
2. अहिल्यानगर -प्राजक्त तनपुरे (भाजप) विरुद्ध दत्तात्रय पानसरे (अपक्ष)
3. जळगाव : नंदकिशोर महाजन (भाजप) विरुद्ध शरद तायडे (ठाकरेंची शिवसेना) विरुद्ध रेश्मा काळे (शिंदेंची शिवसेना बंडखोर)
4. सांगली-सातारा : धैर्यशील कदम (भाजप) विरुद्ध अभयसिंह जगताप (राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार ) विरुद्ध किशोर धुमाळ (अपक्ष)
5. नांदेड : अमर राजूरकर (भाजप) विरुद्ध रामदास पाटील (काँग्रेस)
6. भंडारा-गोंदिया : नरेश ईश्वरकर (काँग्रेस पाठिंबा) विरुद्ध अविनाश ब्राह्मणकर (भाजप)
7. नाशिक : गोकुळ गीते (अपक्ष) विरुद्ध नरेंद्र दराडे (शिवसेना)
8. अमरावती : हर्षदीप देशमुख (काँग्रेस) विरुद्ध प्रवीण पोटे (भाजप) विरुद्ध निलेश विश्वकर्मा (वंचित )
9. धाराशिव-लातूर-बीड : बसवराज पाटील (भाजप) विरुद्ध महेश देशमुख (काँग्रेस)
10. परभणी-हिंगोली : सईद खान (शिवसेना) विरुद्ध डॉ. विवेक नावंदर (ठाकरेंची शिवसेना) विरुद्ध सुशील देशमुख (अपक्ष)
11. छत्रपती संभाजीनगर-जालना : सुहास शिरसाट (भाजप) विरुद्ध गणेश लोखंडे (ठाकरेंची शिवसेना)
12 नागपूर (पोटनिवडणूक) : डॉ. राजीव पोतदार (भाजप) विरुद्ध अतुल लोंढे (काँग्रेस)

# संपादकीय

## तुमच्या शेजारी...

'६०२ मध्ये राहता का आपण?' लिफ्टमध्ये शिरताना एका जपानी बाईंनी मला विचारलं. मी किंचित बिचकून म्हणालो, 'अं? हो.. ६०२ मध्ये!' तोक्योच्या या उपनगरात राहायला येऊन एव्हाना दोन-अडीच वर्षं उलटली होती. आम्ही राहात होतो त्या दहा मजली इमारतीत सगळी कुटुंबं तद्दन जपानी वळणाची, अत्यंत शांत! त्यात आम्ही दोघेच परदेशी - भारतीय. कधीही गाणी लावतात, फुलबाज्या उडवतात, कचरा करतात म्हणून जपानी लोकांचा भारतीयांवर विशेष राग. माझ्या ऑफिसचा 'एचआर' विभाग 'हा जपान आहे. इथल्या शांतताप्रिय आणि नियमबद्ध समाजात राहायचं असेल, तर तुम्हालाही तसंच राहावं लागेल', हे वारंवार सांगत असे. आपला कोणाला त्रास नको हा आमचाही प्रयत्न असे. त्यामुळे '६०२ मध्ये राहता का?' या प्रश्नामागे त्या बाईंची काहीतरी तक्रारच असणार असं मी गृहीत धरलं, पण तेवढ्यात त्या उत्साहाने म्हणाल्या, "ओहोहो! तुम्ही होय ते? व्वा, बरं झालं आपली भेट झाली!" हे ऐकून मला जरा 'हुश्श' झालं. लिफ्टमधून बाहेर पडताना त्या म्हणाल्या, 'तुमच्या घरावरून पुढे जाताना मसाल्यांचा इतका सुंदर घमघमाट जाणवतो.. आपले शेजारी कोण हे बघायला हवं, त्यांच्या मसालेदार पदार्थांची चव चाखून बघावी, असं आम्ही अनेकदा म्हणायचो, पण ओळख कशी काढायची कळत नव्हतं. आत्ता तुम्ही भेटलात, मला छान वाटलं! माझं नाव केईको फुरुतानी. मी तुमच्या शेजारी ६०१ मध्ये राहते.' त्या इमारतीच्या प्रत्येक फ्लॅटच्या किचनचा 'एक्सहॉस्ट' समोरच्या कॉरिडॉरमध्ये होता. त्यामुळे आमच्या घरावरून पुढे जाताना फुरुतानी साननना आमटी भाजी फोडणीचे खमंग अपरिचित सुवास जाणवत असणार! त्या सुवासांनी त्यांना (म्हणजे आणखी एका जपानी कुटुंबाला!) वेड लावलं.. आमचा त्यात थोडासा हातभार! फुरुतानी सानच्या कौतुकाने आम्ही खुश झालो. बीफ, कांदा, बटाटा, गाजर आणि टोमॅटो घालून शिजवलेली करी (जपानी उच्चार : कारेऽ) आणि त्याबरोबर वाफाळणारा भात हे जपानचं लाडकं जेवण. आपल्याकडच्या



टू मिनिट नूडल्समधल्या मसाल्यांच्या जवळच्या चवीची घट्टसर 'करी' ऊर्फ 'कारेऽ' ही 'भारताने आपल्याला दिली' असं जपानी माणूस मानतो. भारतीय कढी आंग्लरूपात 'करी' झाली. मेईजी राज्यक्रांतीनंतर नव्या दमाच्या जपानी आरमाराला आधुनिकीकरणाचे धडे देण्यासाठी ब्रिटिश आरमारी अधिकारी जपानला गेले. त्यांच्या बरोबर 'करी'सुद्धा गेली आणि अल्पावधीतच लोकप्रिय झाली. रासबिहारी बोस हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महान सेनानी भारतातून निसटून जपानमध्ये स्थायिक झाले होते. तोक्योच्या 'नाकामुराया' भागात त्यांनी 'करी रेस्टॉरंट' काढलं होतं. त्यांच्यामुळे 'करी'ची खरी चव जपानला कळली, असंही म्हणतात. त्यानंतर आज इतक्या वर्षांनी जपानी माणसाशी मैत्री करण्याची कोंडी दाण्याचं कूट घालून केलेल्या कांदा टोमॅटो बटाट्याच्या रश्श्याने फोडली. ६०२ चे कुलकर्णी आणि ६०१ च्या फुरुतानी त्याबद्दल आयुष्यभर 'कारेऽ'च्या ऋणात राहणार होते. जपान हे एक कोडं आहे. ते दिसतं तितकं सोडवायला सोपं नाही. आता दर गुरुवारी थोड्या कहाण्या सांगीन म्हणतो!

## संस्कृत सुभाषित

अमृतं शिशिरे वान्हिरमृतं क्षीरभोजनम्। अमृतं
राजसंमान्म अमृतं प्रियदर्शनम्।।

अर्थ – थंडीच्या काळात अग्नि अमृतासमान असतो, भोजनात दूध अमृतासमान असते, समाजात राजाने केलेले कौतुक अमृतासमान असते आणि प्रियजनांचे दर्शन हे नेहमीच अमृतमय असते.

## गुरु वचन

### एका लाकूडतोड्याची गोष्ट

आपण आपल्या लहानपणी ही गोष्ट ऐकलीच असेल. एक लाकूडतोड्या असतो. तो जंगलात एका झाडावर चढून लाकडे तोडत असतो. अचानक त्याच्या हातातून त्याची कुऱ्हाड झाडाखालच्या नदीत कोसळते आणि तो धाय मोकलून रडायला लागतो.

त्याच्याकडे नवी कुऱ्हाड घ्यायला मुळीच पैसे नसताना आणि त्याच्या कुटुंबाचे पोट त्याच्या या कुऱ्हाडीवरच चालत असते. तो झाडे तोडून लाकडं विकून पैसे जमवत असतो.

हे सारं वनातल्या देवाने पाहिलं असते. तो त्या लाकूडतोड्याची परीक्षा घेण्यासाठी रूप बदलून तेथे येतो आणि त्याला रडण्याचे कारण विचारतो. लाकूडतोड्या त्याला झालेला सगळा प्रकार सांगतो आणि त्याला कुऱ्हाड मिळवण्यासाठी मदत करण्याचे आवाहन करतो.

देव पाण्यात उडी घेतो. आधी तो एक सोन्याची कुऱ्हाड काढतो आणि त्या लाकूडतोड्याला विचारतो ही का तुझी कुऱ्हाड? लाकूडतोड्या नाही म्हणतो. मग देव चांदीची कुऱ्हाड काढतो लाकूडतोड्या त्यालाही नाही म्हणतो. मग देव त्याची खरी कुऱ्हाड काढतो आणि विचारतो त्याला अत्यानंद होतो. तीच त्याची खरी कुऱ्हाड असते.

देव आपल्या खऱ्या रूपात येतो आणि विचारतो मी तुला आधी सोने आणि चांदीची कुऱ्हाड दिली, तरी तू त्याला नाही का म्हणालास? लाकूडतोड्या देवाला सांगतो, प्रभू माफ करा परंतु जी वस्तू माझी नाही तिला मी माझी का म्हणू? उगाच मी ती वस्तू घ्यायची आणि नंतर माझी झोप खराब करून घ्यायची याला काय अर्थ? म्हणून मी नाही म्हणालो. देव त्याच्या या उत्तरावर खूश होत त्याला त्या तीनही कुऱ्हाडी भेट देतो.

पाहा कथा किती छोटी आहे, परंतु त्यातून निघणारा अर्थ किती विशाल आहे. जर तुम्ही तुमचे काम अगदी प्रामाणिकपणे केले तर, देव आणि दैवं तुम्हाला कितीतरी पटीने अधिक देते.

म्हणून तुम्ही कोणतेही काम करत असाल तर ते अगदी प्रामाणिकपणे करा, तुम्हाला त्यातून नक्कीच यश मिळेल यात शंका नाही.

## उपदेशकथा

### परनिंदा

संत ऑगस्टाईन एकदा तीन – चार साधकांसह जेवायला बसले होते. संभाषणाच्या ओघात एक साधक दुसऱ्या एका साधकाबद्दल काही गैर बोलू लागला. ते ऐकून ऑगस्टाईन काही बोलले नाहीत पण त्यांनी समोरच्या भिंतीकडे आपली नजर वळवली. निंदा करणाऱ्या साधकाने देखील ऑगस्टाईन बरोबर आपली नजर भिंतीकडे वळवली. भिंतीवर लिहिले होते की, जे कोणी दुसऱ्याची निंदा करतात त्यांना या ठिकाणी जेवायची परवानगी नाही. ते वाचून तो बोलायचे थांबला. दुसऱ्याची निंदा करण्याने तो नर सुधारत नाहीच पण आपले पुण्य मात्र खर्च होते.

कथा उपदेश : निंदा करणे हीनपणाचे लक्षण आहे.

## पंचांग

५ जून २०२६
शुक्रवार
विक्रम संवत्– २०८२
अधिक ज्येष्ठशके
संवत्– १९४८
संवत्सर –पराभवनाम
अयन– उत्तरायणारंभ
मास–अधिक ज्येष्ठ
ऋतु– सौर ग्रीष्म
कृष्ण पक्ष
तिथि:पंचमी २५:२०:२७+
नक्षत्र:श्रवण (अहोरात्र)
योग:ब्रह्म ०९:४१:५८
करण:कौलव १२:२८:३५
करण:तैतिल

२५:२०:२७+
सूर्य:वृषभ
चन्द्र:मकर
हिजरी सन् – १४४७
मुस्लिम मास – जिल्हेज
तारीख – १९
विशेष




जागतिक पार्यवरण दिन
शुभ दिवस

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९६९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 8 | | | | 7 | 5 | | |
| 9 | | | 8 | 5 | | | 6 | |
| 5 | 3 | 1 | | | | | | |
| | | 9 | 6 | 4 | 8 | 2 | | |
| 1 | | 4 | 3 | | 9 | 8 | | 6 |
| | | 8 | 7 | 1 | 5 | 9 | | |
| | | | | | | 3 | 5 | 4 |
| | 4 | | | 7 | 1 | | | 9 |
| | | 5 | 2 | | | | 8 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९६८ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 6 | 4 | 7 | 3 | 1 | 9 | 5 | 8 |
| 5 | 7 | 9 | 6 | 8 | 4 | 3 | 1 | 2 |
| 8 | 1 | 3 | 5 | 2 | 9 | 4 | 6 | 7 |
| 6 | 5 | 7 | 8 | 4 | 2 | 1 | 3 | 9 |
| 1 | 4 | 2 | 3 | 9 | 5 | 8 | 7 | 6 |
| 9 | 3 | 8 | 1 | 7 | 6 | 2 | 4 | 5 |
| 4 | 9 | 6 | 2 | 5 | 3 | 7 | 8 | 1 |
| 7 | 2 | 1 | 4 | 6 | 8 | 5 | 9 | 3 |
| 3 | 8 | 5 | 9 | 1 | 7 | 6 | 2 | 4 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ००७० – रोमन सेनापती टायटसच्या सैन्याने जेरुसलेमची फळी फोडली व शहरात घुसले.
- १३०५ – क्लेमेंट पाचवा पोपपदी.
- १८३२ – पॅरिसमध्ये विद्यार्थ्यांचा उठाव.
- १८४९ – डेन्मार्कने नवीन संविधान अंगिकारले व संवैधानिक राजेशाही कायम केली.
- १८६४ – अमेरिकन गृहयुद्ध–पीडमाँटची लढाई – दक्षिणेचा पराभव.
- १९०० – दुसरे बोअर युद्ध – ब्रिटीश सैन्याने प्रिटोरिया जिंकले.
- १९१५ – डेन्मार्कमध्ये स्त्रीयांना मतदानाचा हक्क.

### आंतरराष्ट्रीय

- २००६ – बाल्कन गणराज्याच्या संसदेने एक प्रस्ताव सादर करत मोंतेनीग्रोला एक स्वतंत्र देश घोषित केले.

### राष्ट्रीय

- १९०७ – स्वामीनारायण पंथाची स्थापना.
- १९८४ – अमृतसरच्या सुवर्ण मंदिरात लपून बसलेल्या अतिरेक्यांचा बीमोड करण्यासाठी भारतीय पंतप्रधान इंदिरा गांधीने मंदिरावर हल्ला करण्याचा आदेश दिला.

### जन्म

- १७७१ – अर्नेस्ट पहिला, हॅनोव्हरचा राजाचा जन्म.
- १८७८ – पांचो व्हिया, मेक्सिकोचा क्रांतीकारीचा जन्म.
- १८७९ – भारतातील संघटित कामगार चळवळीचे जनक नारायण मल्हार जोशीचा जन्म.
- १९०० – डेनिस गॅबॉर, हंगेरीयन–ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेताचा जन्म.
- १९१२ – एरिक हॉलिस, इंग्लिश क्रिकेटपटूचा जन्म.

## : SMS :

You may have 3 reasons for not msging me:
1. No free msg
2. No bal
3. No guts to disturb a 'LION'

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३८ | २८.८ |
| अहमदनगर | ३७.५ | २५.४ |
| अकोला | ४२.८ | ३१.५ |
| अमरावती | ४२.३ | ३०.९ |
| बीड | ४४ | ३२.४ |
| भंडारा | ४३.४ | ३०.४ |
| बुलढाणा | ४१.२ | २८.१ |
| चंद्रपूर | ४३.१ | ३२.७ |
| चेन्नई | ४३.८ | ३२.६ |
| नवी दिल्ली | ४०.५ | ३१.७ |
| धुळे | ४२ | २९.१ |
| गोंदिया | ४२.३ | ३०.५ |
| जळगाव | ४२.२ | ३१.२ |
| कोल्हापूर | ३४.८ | २४.५ |
| लातूर | ३६.५ | २६.१ |
| मुंबई | ४०.४ | ३४.८ |
| नागपूर | ४२.३ | ३० |
| नांदेड | ४१.२ | ३१.८ |
| नंदूरबार | ४०.६ | ३०.१ |
| नाशिक | ३८.५ | २४.७ |
| पुणे | ३५.५ | २४.७ |
| पंढरपूर | ३६.८ | २५.५ |
| सातारा | ३५.७ | २३ |
| सांगली | ३५.४ | २५.३ |
| सोलापूर | ३७.७ | २६.६ |
| वर्धा | ४२.६ | ३१.६ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर आपले काम सेवा या भावनेने करा. आर्थिक परिस्थिती मजबूत राहील.

**वृषभ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर भौतिक सुख साधनाकरिता आपला पैसा खर्च होईल. दुसऱ्यांचा सल्ला आपल्याकरिता फायदेशीर राहील.

**मिथून :** मिथुन शुभ रंग: पांढरा: शुभ दिशा: पश्चिम आपले धैर्य आपल्या कुटुंबात व समाजात मान सन्मान मिळवून देणार आहे.

**कर्क :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: उत्तर भावनेने निर्णय घेऊ नका नुकसान होण्याची शक्यता आहे. आपल्या कामाचे चिज होणार नाही.

**सिंह :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:पूर्व आपली आर्थिक स्थिती उत्तम राहील. व्यापार वाढीकरिता योग्य प्रयत्न करा. सार्वजनिक स्थितीची आपल्याला चिंता राहील.

**कन्या :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर भौतिक साधने मिळण्याचे योग आहेत. मान सन्मान वाढणार आहे. पैसा अधिक खर्च होईल.

**तूळ :** शुभ रंग : पिवळा, शुभ दिशा: पूर्व आज चांगल्या संधी आपणास मिळणार नाही. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**वृश्चिक :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:पूर्व निर्णय घेताना मर्यादा पाळा. कामकाजात अजचणी आल्यामुळे मन दुःखी राहील. निष्कारण शंकेमुळे बेचैन रहाल.


**धनू :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:पूर्व पद, प्रतिष्ठेमध्ये वाढ होईल. मुलांच्या आरोग्याकडे लक्ष द्या. कोणत्यातरी रहस्याचा उलगडा होईल.

**मकर :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर मनमिळावू स्वभावाचा आज आपल्याला फायदा होणार आहे. दुसऱ्यांची मदत फायदेशीर होईल.

**कुंभ :** शुभ रंग: केसरी : शुभ दिशा: पश्चिम आजचा दिवस धावपळीचा राहील परंतु आर्थिक फायदा भरपूर होईल. आळस दूर करा.

**मीन :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पश्चिम आपल्या विचारांची दखल घेतली जाईल. अचानक लाभ होण्याचे योग आहेत.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९६९



**आडवे शब्द**

१. डोळे
३. गीत
६. उणीव
१०. धोतराचा खांद्यावर टाकता येणारा घोळदार भाग
१२. पुन्हा पुन्हा
१४. उन्हाळ्यात जाहिरातबाजीने गळी उतरवले जाणारे
१६. वरवधू
१९. उपयोग
२१. खात्री करणे
२४. अर्धी ओंजळ
२५. सूर्य
२६. तमाशातील कलावंत
२८. नूतन
३०. लहान
३१. किंचीत वाकडा
३२. जवळीक
३५. आपला नसलेला
३७. पंख
३८. वार्ताहरांची बोलवलेली बैठक
४२. श्रीकृष्णाचे एक नाव
४४. आवाज, गोंगाट
४५. ताणलेल्या दोरीचा आवाज
४६. वाळवी
४७. प्रतिष्ठा, अब्रू
४९. सोललेल्या उसाचे तुकडे
५१. चिंतन
५३. केविलवाणा
५५. सरसकट
५८. जैसे थे परिस्थिती
६०. चामखीळ
६१. तंबूचे कापड
६२. रावण
६३. अरण्य
६४. विशेष
६५. 'उंच माझा झोका'मधील बालनायिकेचे पडद्यावरील नाव
६७. अंधार
६९. तपस्या
७१. सावकाश, अंदाज घेत घेत
७३. मोठे (युद्ध, प्रदर्शन)
७५. कोल्ह्यासारखा एक प्राणी
७६. खून, वध
७७. पतीनिधन झालेली
७९. व्यायाम
८०. माजलेला
८१. कोकणातील पूर्वीचे वतनदार, सावकार

**उभे शब्द**

१. अभिनव
२. नट्टपट्टा
४. उलट, विरुद्ध
५. धुंदी, कैफ
६. चषक, पेला
७. सुगंधी पानांची वनस्पती,
८. बोबडी वळल्यानंतरची भाषा
९. दर तासाच्या हिशोबाने
१०. विनासायास होणारे
११. चराऊ कुरणाची जमीन
१३. मुलगा
१५. शिव्यशाप
१७. शिळे झाल्यावर रद्दी
१८. गोदाम
२०. पाताळ
२२. रक्षण करणारा
२३. मन
२६. तशा प्रकारचा
२७. कविता करणारा प्रतिभावंत
२९. उत्तराधिकारी
३३. नामघोष
३४. श्रेष्ठ पुरुष
३६. कागदावरील स्तंभ
३७. घरामागील अंगण
३८. पावलोपावली
३९. पापुद्रा
४०. सहा
४१. भक्कम, मजबूत
४३. दरडणे, शोषण करणे
४८. सर्वस्व
४९. मणका
५०. वाईट इच्छा
५१. आकड्यांच्या जुगाराचा एक प्रकार
५२. राजा
५४. गंध
५६. काटकसर
५७. काळीमा, बट्टा
५९. मृत्तिका
६१. वलयांकित दुनियेतील प्रसिद्ध मराठी छायाचित्रकार– अतुल -----
६३. वस्ती
६६. आई
६७. जर बरोबरचा शब्द
६८. चर्चा
७०. शीख धर्माचे संस्थापक
७२. मवाळ
७३. अरण्य
७४. गाणे
७५. पोळ्या भाजण्याचे पात्र
७८. होड्यांचा थांबा

उत्तर उद्याच्या अंकात

**जम्बो शब्दकोडे क्र. ९६८ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.राजरोस ४.आदानप्रदान ८.सरावाचे ११.मारा १२.काकाजी १४.नवससायास १५.गळका १६.फेरा १७.वर १८.लाभ १९.नस २१.सरसरीत २३.मनकवडा २७.अवयव २९.चव ३१.हाजी ३२.नवल ३३अ.सामना ३५.मनन ३६.भाकरी ३७अ.खोट ४०.डक ४०अ.अंगरखा ४१.दैना ४२.गळचेपी ४३.तरू ४५.मना ४६.मिसळ ४८.कन्या ४९.पालापाचोळा ५२.सकळ ५३.कानवला ५५.काया ५६.कर ५७.पेव ५८.नकार ६०.माळी ६२.लघाळभवानी ६५.रज ६६.पावन ६७.सामरतट ६८.ढ ६९.कर्णधार ७०.माहितगार ७३.पोप ७४.टपरी ७६.पायथा ७७.जमाव ७९.विणकर ८०.चुकार ८१.क्षमा

उभे उत्तर : १.रामायण महाभारत २.जरा ३.सकाळ ४.आजीवन ५.नवरा नवरी ६.दानव ७.नवरस ८.ससा कासव ९.राया १०.वासलात १३.काका १५.गमक २०.सय २२.रचना २४.नजीक २५.वन २६.डावखोरा २८.वसा ३०.जनककन्या ३३.लट ३४.मरगळ ३५अ.नड ३७.रीस ३८.अनामिक ३९.अचेतन ४४.रुपाया ४५.मळा ४७.सळसळ ४८.कलाकार ५०.पाकळी ५१.चोर ५२.सवलत ५३.काजवा ५४.वन ५५.कायापलट ५९.रजतपट ६०.मानकरी ६१.घागर ६३.घाटमाथा ६४.भरत ६७.साधारण ७१.गाजर ७२.रमा ७५.पर्ण ७६.पार ७८.वक्ष

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेला ऐतिहासिक दर्गा प्रशासनाकडून उध्वस्त

■ सर्वसाधारण सभेत जाब विचारण्याचा उपमहापौर परशुराम वाडेकर यांचा इशारा

पुणे (दैनिक संध्या) : जुन्या पुणे मुंबई महामार्गावर असलेला बोपोडी येथील ऐतिहासिक हजरत शमसुद्दीन दर्गा महापालिका प्रशासनाने कोणतेही संयुक्तिक कारण न देता, स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता आणि आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता न करता मनमानी पद्धतीने कारवाई करून उध्वस्त केला आहे, असा आरोप उपमहापौर व स्थानिक नगरसेवक परशुराम वाडेकर यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केला. याप्रकरणी सर्वसाधारण सभेत प्रशासनाला जाब विचारला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. बोपोडी येथे संबंधित दर्गा तब्बल दीडशे वर्षांपासून उभा आहे. त्याला राज्य शासनाचा अ वर्ग प्राप्त आहे. मेट्रो अथवा रस्ता रुंदीकरणात या दर्ग्याची कोणतीही अडचण नाही. या दर्ग्याबाबत कोणत्याही स्थानिक नागरिकाने अथवा लोकप्रतिनिधी तक्रार केलेली नाही. हा दर्गा या परिसरातील हिंदू मुस्लिम एकतेचे प्रतिक होता. तरीही महापालिका प्रशासनाने लोकप्रतिनिधींची दिशाभूल करून या दर्ग्यावर अन्यायकारक कारवाई केल्याचे वाडेकर यांनी सांगितले. शिवशंकर स्वामी नामक एका व्यक्तीने हा दर्गा हटवण्यासाठी महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केल्याची माहिती मिळाल्याचे वाडेकर यांनी सांगितले. दर्ग्याच्या ट्रस्टला पूर्वकल्पना न देता, नोटीस न बजावता, उपमहापौर व स्थानिक नगरसेवक म्हणून आपल्याला व अन्य स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता रात्रीच्या अंधारात करण्यात आलेली ही कारवाई सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्याची मान खाली घालायला लावणारी आहे. रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आपण त्याच्या तीव्र निषेध करतो, असे वाडेकर यांनी सांगितले. या प्रकाराची कल्पना आपण राज्य मंत्रिमंडळातील ज्येष्ठ मंत्री चंद्रकांत पाटील यांना दिली असून त्यांनी देखील या प्रकाराबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्व महत्त्वाच्या नेत्यांचे प्रशासनाच्या मनमानी कारभाराकडे लक्षवेध होणार असल्याचेही वाडेकर यांनी स्पष्ट केले.



### मा. लोकेश चंद्र यांना महा आयकॉन पुरस्कार; केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान

पुणे (दैनिक संध्या) : मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री लोकेश चंद्र यांचा विजेच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल ‘महा आयकॉन 2026’ हा जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्गमंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या हस्ते मुंबईत गुरुवारी हा पुरस्कार देण्यात आला. राज्याचे उद्योगमंत्री श्री. उदय सामंत, प्रसिद्ध शास्त्रज्ञ श्री. अनिल काकोडकर, पुढारी समुहाचे मुख्य संपादक श्री. प्रतापसिंह जाधव आणि संपादक श्री. योगेश जाधव मंचावर उपस्थित होते. महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीत आणि राष्ट्राच्या उभारणीत मोलाचे योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी ‘पुढारी’ माध्यम समूहाने ‘महा आयकॉन 2026’ या नव्या उपक्रमाचे आयोजन केले होते.

### राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या उपस्थितीत येत्या शनिवारी (6 जून) 'शक्ती समिट 2026'





पुणे (दैनिक संध्या) : महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत पुण्यामध्ये येत्या शनिवारी (ता. ६ जून) 'शक्ती समिट २०२६', उद्योजकता परिषद होत आहे. राज्याचे सांस्कृतिक व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार हेही यावेळी उपस्थित असणार आहेत. हिंदू इकॉनॉमिक फोरम (एचईएफ) पुणे जिल्हा चॅप्टरतर्फे शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने येत्या शनिवार, दि. ६ जून २०२६ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६.३० या वेळेत पाषाण येथील पुणे इंटरनॅशनल सेंटरमध्ये (पीआयसी) ही परिषद होणार आहे, अशी माहिती फोरमच्या पुणे जिल्हा चॅप्टरचे अध्यक्ष गौरव त्रिपाठी यांनी दिली. गौरव त्रिपाठी म्हणाले, "अंदमान अँड निकोबारचे नायब राज्यपाल लेफ्ट. जनरल (निवृत्त) ए. के. सिंग, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सफॉर्मेशनच्या नियामक मंडळाचे सदस्य दीपक करंजीकर, वर्ल्ड हिंदू इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक व चेअरमन परमपूज्य स्वामी विज्ञानानंद, भारतीय जनता पार्टीच्या नेत्या श्वेता शालिनी यांच्या हस्ते सकाळी ९ वाजता या परिषदेचे उद्घाटन होणार आहे. परिषदेमध्ये संरक्षण व अंतराळ क्षेत्रावरील सत्रात ‘रेअर अर्थ’चे भू-राजकीय महत्त्व, संरक्षण क्षेत्रातील उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि बदलते युद्धतंत्र यांवर चर्चा होणार आहे. ‘अश्विनी मॅग्नेट्स’चे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रम धूत, अलिकॉन कास्टअलॉयचे हर्षवर्धन गुणे, आर्ममेंट अँड कॉम्बॅट इंजिनिअरिंगचे महासंचालक डॉ. प्रतिक किशोर, एमसीसीएआय'च्या संरक्षण व उच्च शिक्षण समितीचे संचालक प्रशांत जोगळेकर, ब्रिगेडियर वीरेश श्रीवास्तव आणि गोदरेजचे माजी व्यवसाय प्रमुख सुरेंद्र वैद्य मार्गदर्शन करणार आहेत."

### वारजे, मुंढवा परिसरात हातभट्टी अड्ड्यांवर छापे; विषारी रसायनांचा साठा जप्त

पुणे (दैनिक संध्या) : वारजे माळवाडी आणि केशवनगर (मुंढवा) परिसरात सुरू असलेल्या हातभट्टी दारू अड्ड्यांवर पोलिसांनी छापे टाकून दारूसह विषारी रसायनांचा साठा जप्त केला. हडपसर आणि फुगेवाडीत विषारी दारूमुळे अनेकांचे मृत्यू झाल्यानंतरही हे अड्डे सुरूच होते. हे दोन्ही दारू अड्डे महिलाच चालवत असल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वारजे माळवाडीतील काळेश्वरी मंदिराच्या मागील मोकळ्या जागेत नवसागर आणि इतर विषारी रसायने मिश्रित करून गावठी हातभट्टी दारू सर्रास विकली जात होती. बुधवारी (ता. ३) रात्री या अड्ड्यावर वारजे माळवाडी पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी मुख्य आरोपी प्रीती विजय नवले (वय ३८, रा. वारजे माळवाडी) हिला अटक केली आहे. तिच्यासह सागर बिरे, शशी कचरावत, सुधीर कचरावत, संगीता परदेशी, जुबेर शेख, वैशाली उर्फ याडी चव्हाण, लताबाई रास्ते या सात साथीदारांविरुद्ध वारजे माळवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# निवडणुकीत ‘दोन्ही पॅनल एकाच नाण्याच्या दोन बाजू’

## अपक्ष उमेदवार शरद लोणकर यांचा आरोप : महामंडळ आणि सदस्यांच्या हितासाठी अपक्ष संघ सरसावला

पुणे (दै. संध्या)



महामंडळात नव्या नेतृत्वाला संधी देण्याची गरज व्यक्त करताना लोणकर म्हणाले की, विद्यमान गटांच्या राजकारणाला कंटाळलेल्या सभासदांनी यावेळी बदलाचा निर्णय घ्यावा. पुणे, मुंबई आणि राज्यातील सर्व सुज्ञ मतदारांनी मतदानासाठी पुढे आल्यास चांगल्या आणि प्रामाणिक व्यक्तींना संधी मिळू शकेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या आगामी निवडणुकीत समोरासमोर दिसणारी दोन प्रमुख पॅनल प्रत्यक्षात एकाच विचारधारेची असून त्यांच्यातील संघर्ष हा केवळ दिखावा असल्याचा गंभीर आरोप अपक्ष उमेदवार शरद लोणकर यांनी केला आहे. गेल्या दहा वर्षांत महामंडळाच्या कारभारात असलेल्या संचालकांनी चित्रपटसृष्टीच्या प्रश्नांवर ठोस काम करण्याऐवजी अंतर्गत वाद आणि राजकारणातच वेळ घालवल्याचा आरोप त्यांनी केला. प्रस्थापितांची मुजोरी मोडीत काढून महामंडळ आणि सदस्यांच्या हितासाठी आठ अपक्ष उमेदवारांनी एकत्र येऊन संघ उभा केल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

या पत्रकार परिषदेला दिग्दर्शक अमोल भावे, निर्माता महादेव शिरोळकर, मानसिंग कदम, कला दिग्दर्शक उल्हास लांडगे या उमेदवारांसह अपक्ष संघाला पाठिंबा देणाऱ्या अभिनेत्री, निर्मात्या भाग्यश्री देसाई या उपस्थित होत्या. अभिनेत्री स्मिता गोंदकर आणि शाहीर संभाजी भगत यांच्यासह अनेकांचा आपल्याला पाठिंबा असल्याचा दावा अपक्ष संघाच्या वतीने करण्यात आला.

यावेळी बोलताना लोणकर म्हणाले की, दोन्ही पॅनलमधील अनेक माजी संचालक वेगवेगळ्या गटांतून निवडणूक लढवत असले तरी त्यांच्यातील परस्पर समन्वय स्पष्ट दिसून येतो. काही उमेदवारांना बिनविरोध निवडून आणण्यासाठी दोन्ही गटांनी एकमेकांना मदत केल्याचा आरोप करत त्यांनी या संपूर्ण प्रक्रियेला "मिलीभगत" असे संबोधले.

महामंडळाच्या निवडणुकीत राजकीय हस्तक्षेप नसल्याचा दावा देखील त्यांनी फेटाळून लावला. काही उमेदवार आणि राजकीय नेत्यांमधील संबंध सर्वश्रुत असल्याचे सांगत, निवडणूक प्रक्रियेवर राजकीय प्रभाव अद्याप कायम असल्याचे त्यांनी म्हटले.

वितरण आणि प्रसिद्धी विभागातून निवडणूक लढवत असलेल्या लोणकर यांनी आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवारांवरही टीका केली. चित्रपटसृष्टीतील प्रसिद्धी आणि वितरण व्यवसायाच्या नावाखाली आर्थिक शोषण होत असल्याचा आरोप करत, आपण गेली चार दशके विनामूल्य प्रसिद्धीचे काम केले असल्याचे त्यांनी सांगितले.

महामंडळात नव्या नेतृत्वाला संधी देण्याची गरज व्यक्त करताना लोणकर म्हणाले की, विद्यमान गटांच्या राजकारणाला कंटाळलेल्या सभासदांनी यावेळी बदलाचा निर्णय घ्यावा. पुणे, मुंबई आणि राज्यातील सर्व सुज्ञ मतदारांनी मतदानासाठी पुढे आल्यास चांगल्या आणि प्रामाणिक व्यक्तींना संधी मिळू शकेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

गेल्या दशकातील कारभारावर टीका करताना दिग्दर्शक भावे यांनी सभासद, कलाकार आणि तंत्रज्ञांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप केला. ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले यांनी गरीब कलाकारांच्या निवासासाठी आणि वृद्धाश्रमासाठी दिलेल्या जागेवर अद्याप कोणतेही ठोस काम झाले नसल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच महामंडळाच्या निधीचा वापर कार्यालयांसाठी करण्यात आला, मात्र कलाकारांच्या कल्याणासाठी अपेक्षित उपक्रम राबवले गेले नाहीत, असा दावा त्यांनी केला.

महामंडळाच्या घटनेतील बदल, मालमत्ता निर्मिती आणि आर्थिक निर्णयांविषयी सभासदांना पुरेशी माहिती देण्यात आली नसल्याचाही आरोप महादेव शिरोळकर यांनी केला. पुणे महापालिकेकडून अत्यल्प भाडेतत्त्वावर उपलब्ध होऊ शकणारी कार्यालयाची जागा नाकारून नंतर स्वतंत्र कार्यालयांवर खर्च करण्यात आल्याबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केले.

मतदार यादीच्या मुद्द्यावर बोलताना भाग्यश्री देसाई यांनी सुमारे ४० हजार संभाव्य मतदारांना मतदानापासून वंचित ठेवण्यात आल्याचा आरोप केला. सभासदांना मतदानाचा हक्क मिळवून देण्याची आश्वासने देणाऱ्यांनी मतदार यादीतून मृत सदस्यांची नावे वगळलेली नाहीत तर चित्रपटसृष्टीशी काडीचा संबंध नसलेल्या लोकांची नावे मतदार यादीत घुसली आहेत. हा सर्व गुंडा-कुंडांचा मुजोर कारभार असल्याची टीका त्यांनी केली.

वितरण आणि प्रसिद्धी विभागातून निवडणूक लढवत असलेल्या लोणकर यांनी आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवारांवरही टीका केली. चित्रपटसृष्टीतील प्रसिद्धी आणि वितरण व्यवसायाच्या नावाखाली आर्थिक शोषण होत असल्याचा आरोप करत, आपण गेली चार दशके विनामूल्य प्रसिद्धीचे काम केले असल्याचे त्यांनी सांगितले.

## महिला पोलिस सोनाली हिंगे हिचा अटकपूर्व जामीन फेटाळला

पुणे (दै. संध्या)

अल्पवयीन मुलीचा वापर करून एका महाविद्यालयातील प्राध्यापकाकडून सात लाख रुपयांची खंडणी उकळल्याप्रकरणातील महिला पोलिस सोनाली हिंगे हिचा अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला. अतिरिक्त सत्र न्यायाधीश पी. वाय लाडेकर यांनी हा आदेश दिला. याबाबत एप्रिल २०२६ मध्ये बंडगार्डन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात अटकपूर्व जामिनासाठी हिंगे यांनी न्यायालयात अर्ज केला होता. सरकार पक्षातर्फे ॲड. सुनील हांडे यांनी जामिनास विरोध करत, हिंगे ही दामिनी पथकातील सदस्य असून अन्य दोन पोलिस कर्मचाऱ्यांसह खंडणी प्रकरणातील सहआरोपी असल्याचे सांगितले. प्राध्यापकाकडून उकळलेल्या सात लाख रुपयांपैकी एक लाख रुपये तिच्याकडे गेल्याचा आरोप असून, ती रक्कम आणि बनावट अर्ज तयार करण्यासाठी वापरलेला लॅपटॉप जप्त करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. या प्रकरणात इलेक्ट्रॉनिक पुरावे, सीसीटीव्ही फुटेज आणि बनावट अर्जाबाबत अधिक तपास आवश्यक असल्याने अर्जदाराची कोठडीत चौकशी गरजेची असल्याचा युक्तिवाद सरकार पक्षाने केला. सरकार पक्षासह बचाव पक्षाचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने हिंगे हिचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला.

## बांधकाम कामगारांच्या प्रलंबित लाभांसाठी ‘आक्रोश आंदोलन’ छेडणार

पुणे (दै. संध्या)



भारतीय मजदूर संघ संलग्न बांधकाम कामगार महासंघ, महाराष्ट्र प्रदेश यांच्या प्रदेश कार्यकारिणी बैठकीत राज्यातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या प्रलंबित लाभांबाबत तसेच महाराष्ट्र बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या कथित भ्रष्टाचारी कारभाराविरोधात राज्यभर तीव्र आंदोलन उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बांधकाम कामगारांच्या प्रलंबित मागण्या व विविध प्रश्नांसंदर्भात धरणे व ‘आक्रोश आंदोलन’ आयोजित करण्यात येणार असल्याचा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला. नुकतीच पुणे येथील भारतीय मजदूर संघ कार्यालयात महासंघाचे प्रदेशाध्यक्ष श्री. हरी चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. बैठकीस भारतीय मजदूर संघाचे पश्चिम क्षेत्र सहसंघटनमंत्री श्री. मोहन येणूरे, महाराष्ट्र प्रदेश महामंत्री श्री. किरण मिलगीर, असंघटित क्षेत्र सहप्रभारी व प्रवासी कामगार अखिल भारतीय प्रभारी श्री. श्रीपाद कुटासकर, महासंघाचे कोषाध्यक्ष श्री. बाळकृष्ण कांबळे, सरचिटणीस श्री. रविंद्र माने, संघटनमंत्री श्री. संजय सुरोशे, श्री. भगवान साटम तसेच राज्यातील विविध जिल्ह्यांतील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीत महासंघाच्या संघटनात्मक विस्ताराबाबत, सदस्य नोंदणी अभियानाबाबत तसेच बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी आरोप केला की, मंडळामार्फत सध्या राबविण्यात येणाऱ्या वस्तुरूपी लाभ योजनांमध्ये, आरोग्य तपासणी मोहिमांमध्ये तसेच प्रशिक्षण कार्यक्रमांच्या नावाखाली मंडळाच्या निधीचा मोठ्या प्रमाणात गैरवापर होत आहे. दुसरीकडे, नोंदणीकृत बांधकाम कामगारांना थेट आर्थिक लाभ देण्याची योजना प्रलंबित ठेवण्यात आली असून त्यावर विविध जाचक अटी लादून कामगारांची दिशाभूल केली जात आहे. प्रसूती लाभ, गंभीर आजार सहाय्य, शैक्षणिक मदत यांसारख्या महत्त्वाच्या कल्याणकारी योजनांमध्ये मध्यस्थ एजन्सींचा हस्तक्षेप वाढवून भ्रष्टाचारास खतपाणी घालण्यात येत असल्याचा आरोपही महासंघाने केला. मंडळाचा निधी हा बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी खर्च होणे अपेक्षित असताना तो ठेकेदार व एजन्सींना लाभ मिळवून देण्यासाठी वापरला जात असल्याची गंभीर बाब बैठकीत मांडण्यात आली.

## यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना मंजुरीच्या मार्गावर

पुणे (दै. संध्या)



पुरंदर तालुक्यातील मौजे पिंपरे खुर्द येथील भटक्या व विमुक्त जाती-जमाती घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेला अखेर गती मिळाली असून, या योजनेच्या कायदेशीर प्रस्तावास प्रशासकीय स्तरावर सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने लाभार्थी कुटुंबांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

भटक्या व विमुक्त जाती-जमाती समाजाला मूलभूत सुविधा, सुरक्षित निवारा आणि सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार मिळावा या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने ही लोककल्याणकारी योजना लागू केली आहे. पुरंदर तालुक्यातील पिंपरे खुर्द येथील भटक्या-विमुक्त बांधवांनी एकत्रित येऊन या योजनेसाठी गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा केला होता.

या संपूर्ण प्रक्रियेत माजी आमदार मा. संजयजी जगताप, जय भैरवनाथ सामाजिक सेवाभावी संस्था, महाराष्ट्र चे संस्थापक अध्यक्ष मा. विजय सुदामराव जाधव, तसेच समन्वयक मा. दशरथ माळी यांनी विशेष पुढाकार घेत शासन स्तरावर सातत्याने प्रयत्न केले.

पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, पंचायत समिती पुरंदर, गटविकास अधिकारी कार्यालय, ग्रामपंचायत पिंपरे खुर्द, ग्रामसेविका चव्हाण मॅडम, सरपंच श्री. गायकवाड तसेच ग्रामपंचायत सदस्य व स्थानिक नागरिकांच्या सहकार्यामुळे या योजनेचा प्रस्ताव यशस्वीपणे पूर्णत्वास नेण्यात आला.

योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासनाने विविध स्तरांवर आवश्यक परिपत्रके काढून संबंधित विभागांना कार्यवाहीच्या सूचना दिल्या होत्या. त्याचबरोबर पुरंदर तालुक्यातील हा प्रकल्प आदर्श ठरावा यासाठी विविध प्रशासकीय विभागांनी समन्वय साधून काम केले.

यासंदर्भातील अंतिम कायदेशीर प्रस्ताव जय भैरवनाथ सामाजिक सेवाभावी संस्था, महाराष्ट्र यांचे संस्थापक अध्यक्ष विजय सुदामराव जाधव यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने इतर मागास बहुजन कल्याण विभाग, पुणे येथे सादर केला. यावेळी विभागाच्या मार्गदर्शनाखाली मा. जयवंत इंगळे यांनी संबंधित प्रस्ताव स्वीकारला व पुढील प्रशासकीय कार्यवाहीबाबत आवश्यक मार्गदर्शन केले.

शासनाच्या नियमानुसार पुढील प्रक्रिया पूर्ण करून लाभार्थी कुटुंबांना या योजनेचा लाभ देण्यासाठी प्रशासन सकारात्मक असून, लवकरच या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी होईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## सौर कृषिपंपांमध्ये गाठला देशात सर्वाधिक १० लाखांचा टप्पा

पुणे (दै. संध्या)

सौर कृषिपंपामध्ये विश्वविक्रम करणाऱ्या महाराष्ट्राने बुधवारी (दि. ३) देशात सर्वाधिक १० लाख सौर कृषिपंपांचा टप्पा पूर्ण केला आणि देशपातळीवर एक नवा इतिहास रचला आहे. पीएम कुसुम-बी व मागेल त्याला सौर कृषिपंप अंतर्गत महाराष्ट्राने ही ऐतिहासिक कामगिरी केली आहे. देशातील एकूण सौर कृषिपंपांपैकी तब्बल ६४ टक्के सौर पंप एकट्या महाराष्ट्रात कार्यान्वित झाले आहेत. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी या अभिमानास्पद कामगिरीमध्ये योगदान देणाऱ्या सर्वांचे अभिनंदन केले आहे. प्रधानमंत्री कुसुम-बी आणि राज्य शासनाच्या मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेची महावितरणकडून प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरणने सौर कृषिपंपामध्ये मोठी आघाडी घेतली आहे.

देशात आतापर्यंत एकूण १५ लाख ६२ हजार २८९ सौर कृषिपंप कार्यान्वित करण्यात आले आहेत. त्यापैकी तब्बल १० लाख ४७२ (६४ टक्के) एकट्या महाराष्ट्रात तर उर्वरित सर्व राज्यांमध्ये एकूण ५ लाख ६१ हजार ८१७ (३४ टक्के) कृषिपंप कार्यान्वित झाले आहेत. महाराष्ट्रानंतर हरियाणा- १ लाख ९० हजार, राजस्थान- १ लाख २७ हजार, उत्तरप्रदेश- ७१ हजार ५३८, झारखंड- ६१ हजार ४५२, गुजरात- २१ हजार ८९४ अशी क्रमवारी आहे.

## आरएसपीएल समूहाने ५० वर्षांचा प्रवास केला साजरा

पुणे (दै. संध्या)

भारतातील आघाडीच्या वेगाने विक्री होणाऱ्या ग्राहक वस्तू उत्पादक समूहांपैकी एक असलेल्या आरएसपीएल समूहाने आपल्या स्थापनेची ५० वर्षे पूर्ण केली असून, कानपूरपासून भारत आणि जागतिक स्तरावरील वाढत्या उपस्थितीपर्यंतचा प्रेरणादायी प्रवास अधोरेखित केला आहे. गेल्या अनेक दशकांमध्ये कंपनीने “भारतामध्ये निर्मित, भारतासाठी” या दृष्टिकोनाला चालना देत देशभरातील २४ हून अधिक उत्पादन प्रकल्पांद्वारे देशांतर्गत उत्पादन क्षमतांना बळकट केले आहे. या महत्त्वपूर्ण टप्प्याचे स्मरण करण्यासाठी, आरएसपीएल समूहाने एक लघुपट सादर केला आहे, जो कंपनीचा प्रवास, मूल्ये आणि विकसित होत जाणारी दृष्टी जिवंत करतो. प्रसिद्ध अभिनेते आणि चित्रपट निर्माते रजत कपूर यांच्या निवेदनातून साकारलेला हा चित्रपट भारतासोबत विकसित झालेल्या ब्रँडची भावना प्रतिबिंबित करतो.

हा समूह आपल्या प्रमुख ब्रँड घडी डिटर्जंटच्या स्थापनेला पाच दशके पूर्ण झाल्याचा उत्सव साजरा करत आहे. या ब्रँडची सुरुवात उत्तर प्रदेशातील कानपूरच्या मध्यवर्ती भागात श्री. मुरलीधर ज्ञानचंदानी आणि श्री. बिमल कुमार ज्ञानचंदानी यांनी केली होती. देशभरातील लाखो कुटुंबांचा विश्वास संपादन केलेल्या घडी डिटर्जंटला आज ३२ टक्के घरांमध्ये स्थान मिळाले आहे, जे गुणवत्ता आणि मूल्य यांच्याप्रती असलेल्या त्याच्या सातत्यपूर्ण वचनबद्धतेचे प्रतीक आहे. एका एकमेव दृष्टिकोनातून सुरू झालेला हा प्रवास आज जागतिक उद्योगसमूहात परिवर्तित झाला असून, आरएसपीएलची उत्पादने नेपाळ, बांगलादेश आणि इथिओपिया यांसारख्या अनेक देशांमध्ये पोहोचत आहेत.

आरएसपीएल समूहाने शिक्षण, आरोग्यसेवा, प्राणी कल्याण, पर्यावरण, पाणी आणि स्वच्छता, आपत्ती निवारण, क्रीडा प्रोत्साहन आणि समुदाय कल्याण यांसारख्या उपक्रमांना पाठिंबा देत मोठ्या प्रमाणावर समाज सशक्तीकरण केले आहे. समूहाने महिलांचा सहभाग वाढवून समान रोजगार संधींना प्रोत्साहन देत कर्मचारी सक्षमीकरण अधिक मजबूत केले आहे. साबण आणि डिटर्जंटपासून सुरू झालेला हा समूह हळूहळू स्वच्छता सेवा, वैयक्तिक निगा, दुग्धजन्य पदार्थ आणि आइस्क्रीम, रासायनिक उत्पादन, फॅशन आणि जीवनशैली तसेच अन्न व पेय क्षेत्रांमध्ये मजबूत उपस्थिती असलेल्या विविध व्यवसाय समूहामध्ये विकसित झाला आहे. याशिवाय त्याचा विस्तार स्थावर मालमत्ता, पायाभूत सुविधा आणि अक्षय ऊर्जा क्षेत्रांपर्यंत झाला असून, भारतातील अत्यावश्यक आणि भविष्याभिमुख क्षेत्रांमधील सर्वांगीण विकासाचे प्रतिबिंब दाखवतो. मजबूत संशोधन क्षमता, ग्राहककेंद्री उत्पादन विकास, प्रगत सूत्ररचना आणि शाश्वत उत्पादन पद्धती यांचा समावेश आहे. गुणवत्ता सुधारणा, कार्यक्षमतेतील उत्कृष्टता आणि पुढील पिढीतील उपाययोजनांमध्ये सातत्याने गुंतवणूक करून,

राहुल ज्ञानचंदानी, संयुक्त व्यवस्थापकीय संचालक, आरएसपीएल समूह म्हणाले, “पाच दशकांचा उत्सव साजरा करताना, कानपूरमधील घडी डिटर्जंटपासून घराघरांत आणि उद्योगांमध्ये विश्वासार्ह नाव बनण्यापर्यंतचा आरएसपीएलचा प्रवास आमच्या ‘भारतामध्ये निर्मित, भारतासाठी’ या तत्त्वज्ञानाच्या कायमस्वरूपी सामर्थ्याचे प्रतीक आहे. पुढे पाहता, आम्ही आमच्या साबण आणि डिटर्जंट विभागामध्ये नावीन्याधारित वाढीवर अधिक भर देत आहोत. आम्ही भारतीय ग्राहकांच्या गरजांनुसार विकसित होणारी उत्पादने प्रदान करण्यासाठी आणि दीर्घकालीन जबाबदार विकास साधण्यासाठी कटिबद्ध आहोत.”

## थोडक्यात पण महत्वाचे...




### खरीप हंगामाच्या पूर्वतयारी बाबत बीजप्रक्रियेचे कृषी प्रशिक्षण शिबीर

भिगवण (दैनिक संध्या) : म्हसोबावाडी (ता.इंदापूर) येथे प्रात्यक्षिक भिगलण- कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांसाठी खरीप हंगामाच्या पूर्वतयारी बाबत प्रकाश सापळा व बीजप्रक्रियेचे कृषी प्रशिक्षण शिबीर म्हसोबावाडी (ता.इंदापूर) येथे पार पडले.हे कृषी प्रशिक्षण शिवाजी काळे यांच्या शेतावर आयोजित करण्यात आले. यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी सचिन मोरे यांनी हुमणी अळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी 'प्रकाश सापळा' कसा तयार करावा आणि त्याचा वापर कसा करावा, याचे थेट प्रात्यक्षिक दाखवले. त्याचप्रमाणे, पिकांची उगवण क्षमता वाढवण्यासाठी आणि रोगांपासून संरक्षण करण्यासाठी 'बीजप्रक्रिया' कशी करावी, याचे महत्त्व त्यांनी शेतकऱ्यांना पटवून दिले. घरच्या बियाण्यांची उगवण क्षमता कशी तपासावी, याबद्दलही त्यांनी सोप्या भाषेत माहिती दिली.यावेळी तालुका कृषी अधिकारी श्री गरगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक कृषी अधिकारी सचिन मोरे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.यावेळी दत्तात्रय ढमाळ, भाऊ जाधव यांच्यासह इतरही प्रगतशील शेतकऱ्यांनी प्रशिक्षणामध्ये सहभाग घेतला.याप्रसंगी मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

### राज्यभर इंधनाची उपलब्धता स्थिर; इंधन वितरणावर कोणतेही निर्बंध नाहीत

पुणे (दैनिक संध्या) : इंडियनऑइल आपल्या विस्तृत पुरवठा आणि वितरण नेटवर्कद्वारे देशभरात पेट्रोल (एमएस),डिझेल (एचएसडी) आणि द्रवीकृत पेट्रोलियम वायू (एलपीजी) यांचा पुरेसा आणि अखंडित पुरवठा कायम ठेवत आहे.सर्व रिटेल विक्री केंद्रांवर इंधन वितरणाची प्रक्रिया सुरळीतपणे सुरू असून पुरवठा कोणत्याही निर्बंधांशिवाय कायम ठेवला जात आहे. रिटेल विक्री केंद्रांचे संचालन हे पीईएसओ परवाने आणि जिल्हाधिकाऱ्यांनी जारी केलेल्या ना हरकत प्रमाणपत्रांनुसार (एनओसी) केले जाते. त्यामुळे इंधन वितरणासाठी त्यांना पीईएसओच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. पुरवठा साखळीमध्ये पेट्रोलियम उत्पादनांचा पुरेसा साठा उपलब्ध असून मागणी प्रभावीपणे पूर्ण करण्यासाठी पुनर्भरणाची कामे सातत्याने सुरू आहेत. एकूण पुरवठा परिस्थिती स्थिर असून सर्व लॉजिस्टिक्स आणि वितरण वाहिन्या सुरळीत व प्रभावीपणे कार्यरत आहेत.घरगुती ग्राहकांसाठी एलपीजीचा पुरवठाही नियमितपणे सुरू असून सर्व प्रदेशांमध्ये वितरण अखंडितपणे सुरू आहे. नागरिक,उद्योग क्षेत्र आणि कृषी ग्राहकांना आवश्यक पेट्रोलियम उत्पादनांचा अखंडित पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी इंडियनऑइल राज्य सरकारे, स्थानिक प्रशासन आणि पुरवठा साखळीतील भागीदारांशी जवळून समन्वय साधून कार्य करत आहे. ग्राहकांनी नेहमीप्रमाणे खरेदी सुरू ठेवावी आणि अनावश्यक किंवा घाबरून जाऊन मोठ्या प्रमाणात खरेदी करणे टाळावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# आकाशच्या विद्यार्थ्यांची जेईई ॲडव्हान्स्डमध्ये चमकदार कामगिरी

**पुणे (दै. संध्या) :**




परीक्षा तयारी सेवांमधील राष्ट्रीय स्तरावरील अग्रणी असलेल्या आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडने (एईएसएल) जेईई ॲडव्हान्स्ड 2026 परीक्षेत पुन्हा एकदा उत्कृष्ट कामगिरी केली आहे. राष्ट्रीय स्तरावर, आकाशच्या विद्यार्थ्यांनी अखिल भारतीय रँकच्या (एआर) टॉप १०० मध्ये अनेक रँक मिळवले आहेत, ज्यात एआर ४, एआर १७, एआर ३५, एआर ४१, एआर 42, एआर 52, एआर 59, एआर 63, एआर 86 आणि एआर 94 यांचा समावेश आहे. या कामगिरीने शैक्षणिक उत्कृष्टता आणि सातत्यपूर्ण निकालांप्रति संस्थेची वचनबद्धता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. या यशात भर घालत, महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांनी परीक्षेत प्रभावी कामगिरी केली आहे, अनेक उल्लेखनीय रँक मिळवले आहेत आणि भारतातील सर्वात स्पर्धात्मक अभियांत्रिकी प्रवेश परीक्षांपैकी एक असलेल्या या परीक्षेत राज्याचे मजबूत अस्तित्व दाखवून दिले आहे. महाराष्ट्रातील आकाश केंद्रांमधील एकूण ५९ विद्यार्थ्यांनी जेईई ॲडव्हान्स्ड 2026 मध्ये यश मिळवले आहे, जे त्यांचे कठोर परिश्रम, चिकाटी आणि शैक्षणिक उत्कृष्टतेप्रती असलेली वचनबद्धता दर्शवते. हे यश एईएसएल च्या संरचित शिक्षण प्रणाली, अनुभवी शिक्षक आणि परीक्षेच्या तयारीसाठी असलेल्या विद्यार्थी-केंद्रित दृष्टिकोनाची परिणामकारकता देखील अधोरेखित करते. महाराष्ट्रातील यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये पुणे-PCMC येथील दीक्षांत शर्मा आघाडीवर आहे, ज्याने प्रभावी एआर ६३ मिळवून, राज्यातील आकाशचा सर्वोच्च रँक मिळवणारा विद्यार्थी म्हणून स्थान मिळवले आहे. त्याच्या पाठोपाठ मुंबई बोरिवलीच्या साहिल चंद्रकांत प्रधानने एआर 143 मिळवला, तर मुंबई चेंबूरच्या श्लोक टेटने एआर 726 मिळवला. इतर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांमध्ये सोलापूरचा सारंग पवार (एआर 1567), पुणे पुलगेट कॅम्पचा पियुष यादव (एआर 2358) आणि सांगलीची स्वरा अहंकारी (एआर 2922) यांचा समावेश आहे. पुणे, मुंबई, सोलापूर, सांगली, अमरावती, ठाणे, नेरुळ आणि लातूर येथील केंद्रांमधील विद्यार्थ्यांची ही दमदार कामगिरी, आकाशच्या संरचित शिक्षण प्रणाली आणि तज्ञ मार्गदर्शनातून जोपासलेली शैक्षणिक गुणवत्ता, समर्पण आणि स्पर्धात्मक वृत्ती दर्शवते. हे विद्यार्थी एईएसएल च्या क्लासरूम प्रोग्रॅम्समध्ये दाखल झाले होते, जे जेईई ॲडव्हान्स्ड सारख्या अत्यंत स्पर्धात्मक परीक्षांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करण्यासाठी आवश्यक असलेली संकल्पनात्मक स्पष्टता, विश्लेषणात्मक विचार आणि समस्या सोडवण्याची कौशल्ये विकसित करण्यावर लक्ष केंद्रित करतात. जेईई ॲडव्हान्स्ड ही प्रतिष्ठित इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (IITs) मध्ये प्रवेश मिळवण्याचे प्रवेशद्वार आहे आणि जगातील सर्वात आव्हानात्मक अभियांत्रिकी प्रवेश परीक्षांपैकी एक मानली जाते. जेईई Main उत्तीर्ण झाल्यावर उमेदवार जेईई ॲडव्हान्स्ड साठी पात्र ठरतात आणि देशभरातील IITs व इतर प्रमुख अभियांत्रिकी संस्थांमध्ये प्रवेशासाठी स्पर्धा करतात. आपला आनंद व्यक्त करताना विद्यार्थी म्हणाले, "आमच्या तयारीच्या संपूर्ण प्रवासात सततचे मार्गदर्शन, शैक्षणिक पाठिंबा आणि सल्ला दिल्याबद्दल आम्ही आकाशचे आभारी आहोत. अभ्यास साहित्य, वर्गातील सत्रे, सराव परीक्षा आणि नियमित मूल्यमापनामुळे आम्हाला आमच्या संकल्पना अधिक पक्क्या करण्यास आणि कामगिरी सुधारण्यास मदत झाली. आमच्या शिक्षकांच्या आणि पालकांच्या पाठिंब्याशिवाय हे यश शक्य झाले नसते."

## कोकणच्या विकासासाठी कटिबद्ध; प्रश्न सोडविण्यावर भर देणार : अनिकेत तटकरे

**चिपळूण (दै. संध्या) :**



कोकण स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषदेवर बिनविरोध निवड झाल्यानंतर आमदार अनिकेत तटकरे यांनी चिपळूण येथे पत्रकारांशी संवाद साधताना महाविकास आघाडीचे उमेदवार बाळ माने यांच्या भूमिकेचे स्वागत करत त्यांचे मनापासून आभार मानले. कोकणच्या विकासाशी संबंधित उर्वरित प्रश्न सोडविण्यासाठी आपण प्राधान्याने काम करणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

अनिकेत तटकरे म्हणाले की, या निवडणुकीत महायुतीतील सर्व घटक पक्षांच्या नेत्यांनी, पदाधिकाऱ्यांनी आणि लोकप्रतिनिधींनी दिलेल्या पाठिंब्यामुळेच ही बिनविरोध निवड शक्य झाली. यासाठी त्यांनी महायुतीच्या सर्व नेत्यांचे, कार्यकर्त्यांचे तसेच मतदारसंघातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींचे आभार व्यक्त केले.

महाविकास आघाडीचे उमेदवार बाळ माने यांनी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा घेतलेला निर्णय हा लोकशाही प्रक्रियेत महत्त्वाचा असल्याचे सांगत तटकरे यांनी त्यांच्या भूमिकेचे स्वागत केले. "बाळ माने यांनी घेतलेल्या निर्णयामुळे निवडणूक बिनविरोध झाली. त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानतो," असे ते म्हणाले.

यावेळी त्यांनी राजकीय घडामोडींवर भाष्य करताना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी "सुनील तटकरेंकडे भानामती आहे" असे वक्तव्य करून त्यांच्या राजकीय करिष्म्याला अप्रत्यक्षपणे मान्यता दिल्याची टिप्पणी केली. सुनील तटकरे यांच्या नेतृत्वाखाली कोकणात विकासाची अनेक कामे झाली असून त्याच विकासाच्या धाग्याला पुढे नेण्याचे काम आपण करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कोकणातील पायाभूत सुविधा, मत्स्यव्यवसाय, पर्यटन, उद्योग, शिक्षण तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांशी निगडित विविध प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी विधान परिषद सदस्य म्हणून सक्रियपणे पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या विजयाबद्दल बोलताना अनिकेत तटकरे यांनी हा विजय राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना समर्पित करत असल्याचे सांगितले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि महायुतीच्या एकजुटीमुळेच हा विजय शक्य झाल्याचे त्यांनी नमूद केले.

कोकणच्या सर्वांगीण विकासासाठी आणि जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आपण पूर्ण क्षमतेने काम करू, अशी ग्वाही त्यांनी यावेळी पत्रकार परिषदेत दिली.

## ३.२६ लाख एकर क्षेत्र झाले पराली जाळण्या पासून मुक्त

**मुंबई (दै. संध्या) :**

जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने एचडीएफसी बँकेने त्यांच्या परिवर्तन उपक्रमाचा एक भाग म्हणून सीआयआय फाऊन्डेशनच्या सहकार्याने क्रॉप रेसिड्यू मॅनेजमेंट (सीआएम) उपक्रमा अंतर्गत एक महत्त्वपूर्ण टप्पा पार केला असून या अंतर्गत २०२५ च्या मौसमात पंजाब आणि हरियाणातील ८८ टक्के म्हणजेच ३,७८,४२५ एकर क्षेत्राला पराली जाळण्यापासून वाचवण्यात यश मिळाले आहे. लुधियाना आणि संगरुर जिल्ह्यात असलेल्या ३८० गावांमधील ८६,००० शेतकऱ्यांपर्यंत पोहोचून या कार्यक्रमाच्या माध्यमातून सर्वसमावेशक आणि निष्कर्श दिसून येणाऱ्या प्रयत्नांच्या माध्यमातून उत्तर भारतातील कृषी क्षेत्रामुळे होणाऱ्या हवेच्या प्रदुषणावर मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. भात कापणीनंतर उरलेल्या परालीचे जाळणे हे दर हिवाळ्यात उत्तर भारतावर पसरून राहणाऱ्या गंभीर वायूप्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या घटकांपैकी एक आहे. यामुळे जनजीवन विस्कळीत होते आणि दीर्घकालीन हृदय व फुफ्फुसांच्या आजारांमध्ये वाढ होते. सुमारे १/३ एकर शेतातून निर्माण होणाऱ्या एका टन भाताच्या परालीचे जाळल्याने वातावरणात तीन किलोग्रॅम प्रदुषण करणारे घटक उत्सर्जित होतात, तसेच जमिनीतील आवश्यक पोषक तत्त्वेही नष्ट होतात. २०२५ मध्ये पंजाब आणि हरियाणामध्ये पराली जाळण्याच्या घटनांमध्ये ५३% घट झाली असली, तरी लहान आणि सूक्ष्म शेतकऱ्यांना यंत्रसामग्री उपलब्ध करून घेणे आणि पिकांच्या अवशेषांचे व्यवस्थापन करणे, विशेषतः दोन हंगामांमधील अगदी थोड्या काळात, अजूनही आव्हानात्मक ठरत आहे.

## भारतीय सनदी लेखाकार संस्थेच्या (ICAI) अभ्यास मंडळावर प्रा. सीए डॉ. एम. एस. जाधव यांची निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती

**जेजुरी (दै. संध्या) :**



डॉ. एम. एस. जाधव

भारतीय सनदी लेखाकार संस्था (ICAI)च्या अभ्यास मंडळ (शैक्षणिक) समितीवर प्रा. सीए डॉ. एम. एस. जाधव यांची निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती ICAI चे अध्यक्ष सी.ए प्रसन्न कुमार डी यांनी केली आहे.

नुकतेच अभ्यास मंडळ (शैक्षणिक) चे अध्यक्ष म्हणून CA Babu Abraham Kallivayalil तसेच उपाध्यक्ष म्हणून CA Satish Kumar Gupta यांनी पदभार स्वीकारला आहे. त्यानंतर नव्या कार्यकारिणीची रचना करण्यात आली असून त्यामध्ये प्रा. सीए डॉ. एम. एस. जाधव यांचा समावेश करण्यात आला आहे.

अभ्यास मंडळाची (शैक्षणिक) महत्त्वपूर्ण सभा २२ जून २०२६ रोजी आयोजित करण्यात आली असून या बैठकीत ICAI संस्थेच्या शैक्षणिक धोरणांबाबत, विद्यार्थ्यांसाठी व सदस्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, प्रकल्प, उपक्रम तसेच भावी धोरणांवर सविस्तर चर्चा होणार आहे. तसेच विद्यमान योजनांमध्ये अधिक परिणामकारक सुधारणा कशा करता येतील यावरही सदस्यांकडून सूचना व मार्गदर्शन घेतले जाणार आहे.

या नियुक्तीबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना प्रा. सीए डॉ. एम. एस. जाधव यांनी सांगितले की, "ICAI च्या अभ्यास मंडळाच्या कार्यात सहभागी होण्याची संधी मिळणे ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. संस्थेच्या शैक्षणिक धोरणांबाबत चर्चा करून निर्णय प्रक्रियेत योगदान देण्याची संधी मिळत असल्याचा मला मनस्वी आनंद आहे."

जगातील सर्वात मोठ्या व्यावसायिक लेखापाल संस्थांपैकी एक असलेल्या ICAI कडे सध्या ११ लाखांहून अधिक विद्यार्थी आणि साडेपाच लाखांहून अधिक सदस्य आहेत. अशा जागतिक स्तरावरील संस्थेच्या शैक्षणिक धोरणे, अभ्यासक्रम विकास आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांच्या नियोजनात गेली पाच वर्षे सहभागी होण्याची संधी मिळाल्याचा आनंदही त्यांनी व्यक्त केला.

या नियुक्तीमुळे प्रा. सीए डॉ. एम. एस. जाधव यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक अनुभवाचा लाभ ICAI च्या भावी शैक्षणिक धोरणांना होणार असल्याची भावना संस्थेतील सदस्यांनी व्यक्त केली आहे.

## अनुसूचित जाती आयोगाच्या आदेशाकडे दुर्लक्ष? बुद्धभूमी फाऊंडेशनवरील स्तूप उद्ध्वस्त

**कल्याण (दै. संध्या) :**

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाच्या आदेशाला बगल देत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने (केडीएमसी) बुद्धभूमी फाऊंडेशन परिसरातील तीन बुद्ध स्तूप पाडल्याचा आरोप करण्यात आला आहे. या कारवाईदरम्यान भगवान बुद्धांच्या मूर्ती हटविण्याचा प्रयत्न, बौद्ध स्तूप आणि भीमा कोरेगाव विजयस्तंभाची तोडफोड झाल्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने बौद्ध समाजात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. बुद्धभूमी फाऊंडेशनचे अध्यक्ष गौतमरत्न महाथेरो यांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ मे रोजी महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी शिष्टमंडळाशी चर्चा करून मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, संयुक्त मोजणी किंवा कोणत्याही प्रकारचा मोबदला न देता २६ मे रोजी बुद्ध मूर्ती हटविण्याबाबत नोटीस देण्यात आली. त्यानंतर ३० मे रोजी सुमारे ३०० पोलिसांच्या बंदोबस्तात कारवाई करत तीन बौद्ध स्तूप आणि भीमा कोरेगाव विजयस्तंभ हटविण्यात आल्याचा आरोप फाऊंडेशनने केला आहे. या कारवाईदरम्यान बुद्ध मूर्तींसह परिसरातील सुमारे ४२ झाडे जेसीबीच्या साहाय्याने हटविण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचेही सांगण्यात आले. त्यामुळे धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक भावनांचा अवमान झाल्याची भावना बौद्ध समाजातून व्यक्त होत आहे. फाऊंडेशनच्या म्हणण्यानुसार, यापूर्वी ऑगस्ट २०२५ मध्येही विकासकामांच्या नावाखाली बुद्धभूमी फाऊंडेशनची सुमारे तीन एकर जमीन ताब्यात घेण्यात आली होती. त्यामुळे परिसराचे संकुचन होऊन धार्मिक स्थळाच्या पावित्र्यावर परिणाम झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

## सुबोध भावे अभिनीत 'श्री बाबा नीब करोरी महाराज' ला उदंड प्रतिसाद



पुणे (दै. संध्या) : २९ मे २०२६ रोजी प्रदर्शित झालेल्या 'श्री बाबा नीब करोरी महाराज' या चित्रपटाला प्रेक्षकांकडून अत्यंत उबदार प्रतिसाद मिळत आहे. प्रेक्षक या चित्रपटातील आध्यात्मिक खोली, भावस्पर्शी कथाकथन आणि प्रामाणिक अभिनयाचे विशेष कौतुक करत आहेत. आदरणीय नीम करोली बाबा यांचे जीवन, त्यांची शिकवण आणि त्यांचा वारसा अत्यंत भक्तीभावाने व अस्सलतेने मोठ्या पडद्यावर मांडल्याबद्दल सोशल मीडियावर प्रेक्षक या चित्रपटाची भरभरून प्रशंसा करत आहेत. नीम करोली बाबा यांची भूमिका साकारणारे अभिनेते सुबोध भावे यांच्यावर विशेष कौतुकाचा वर्षाव होत आहे; त्यांच्या शांत, तल्लीन आणि मनाचा ठाव घेणाऱ्या अभिनयाचे सर्वत्र कौतुक होत आहे. आपल्या दमदार अभिनयासाठी आणि चरित्रपटांमधील भूमिकांसाठी ओळखल्या जाणाऱ्या भावे यांनी या आध्यात्मिक व्यक्तिमत्त्वात केलेले रूपांतर प्रेक्षकांच्या मनाला खोलवर भिडले आहे.


फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद फुरसुंगी,
ता. हवेली, जि. पुणे-४१२३०८
ई-मेल: fursungi.urulidevachinp2024@gmail.com

जा.क्र./फुउदेनप/न.र./ ५०४ — दिनांक ०४/०६/२०२६

**जाहीर नोटीस**

फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद हद्दीतील सर्व इमारत मालक, भोगवटादार, भाडेकरू तसेच होर्डिंगधारक इ. यांना या जाहीर नोटीसद्वारे कळिवण्यात येते की, अवकाळी पाऊस, मान्सूनचा पाऊस, वादळी वारा यामुळे मोडकळीस आलेल्या, भग्नावस्थेत व धोकादायक स्थितीत असणाऱ्या इमारती पडण्याचा / ढासाळण्याचा संभाव्य धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच अतिवृष्टी किंवा संततधार पावसामुळे नदी व नाल्यास पूर येऊन नदी व नाला यांच्याकाठी असणाऱ्या अनाधिकृत झोपड्या घरे यांना संभाव्य धोका निर्माण होऊ शकतो. सबब अशा धोकादायक इमारती / मिळकतधारक, भोगवटादार, भाडेकरू यांना महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १९५ व २९९ अन्वये धोकादायक इमारत काढून टाकण्यास किंवा दुरुस्त करण्यास जाहीर सूचना देत आहे. तसेच नगरपरिषद हद्दीतील अनधिकृत /सुस्थितीत नसलेले होर्डिंग काढून घेणे आवश्यक आहे. याउपरही अशा धोकादायक इमारती / स्ट्रक्चरमुळे कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झाल्यास मालक, भोगवटादार, भाडेकरू जबाबदार राहतील व त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. होणाऱ्या दुर्घटनेस किंवा जीवित वा वित्तहानीस फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद जबाबदार राहणार नाही. तसेच नदीकाठावरील व नाल्याच्या काठावरील अनाधिकृत झोपड्या / घरे यांचे पावसाळ्यापूर्वी स्थलांतरण करून घ्यावे. पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे नदी व नाल्याकाठच्या अनाधिकृत झोपड्या / घरे व त्यात राहणारे नागरिकांची आर्थिक नुकसान व जीवितहानी झाल्यास त्यास फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

शिक्का

सही/-
मुख्याधिकारी
फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद



## पुरंदर नागरी सहकारी पतसंस्था मर्या, सासवड

मुख्य कार्यालय : मार्केटयार्ड, सासवड ता.पुरंदर, जि.पुणे फोन : २२२५०३

**स्थावर मालमत्ता ताबा नोटीस (नमुना - ह)**

*(महाराष्ट्र सहकारी संस्थाचा नियम १९६१ मधील नियम क्र.१०७ उपनियम [११(ड१)]अन्वये)*

तमाम लोकांना कळविण्यात येते की, खालील थकबाकीदार, सहकर्जदार व त्यांचे दोन जामीनदार यांनी संस्थेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड न केल्यामुळे मा. विशेष वसुली व विक्री अधिकारी पुणे द्वारा पुरंदर नागरी सहकारी पतसंस्था मर्या, सासवड, मुख्य कार्यालय सासवड ता.पुरंदर, जि.पुणे यांनी त्यांचे विरूध्द महाराष्ट्र संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१(१) अन्वये मिळालेल्या वसुली दाखल्यास अनुसरून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चा नियम १०७(११) डी/१ पहिली सुधारणा नियम २०१४ दिनांक १४/१२/२०१४ च्या अधिसुचनेप्रमाणे ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे ऋणकोला या प्रमाणे नोटीस देण्यात येत आहे. आणि सर्व नागरीकांना खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम क्र.१०७(११) डी/१ अन्वये दिलेल्या अधिकारानुसार खालील परिशिष्ट मधील नमूद केलेल्या लवादी थकबाकीदारांच्या स्थावर मालमत्तांचा प्रतीकात्मक ताबा घेतलेला आहे.

विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरीकांना याद्वारे सावध करण्यात येते की, मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये. या नोटीशीच्या तारखेनंतर सदर स्थावर मालमत्ता तबदील केल्यास, कोणतेही खासगी हस्तांतरण, स्वीकृत करण्यास किंवा बोजा निर्माण करण्यास अगर तारण देण्यास या नोटीशीअन्वये मनाई करण्यात येत आहे. आणि या स्थावर मालमत्तेप्रकरणी व्यवहार केल्यास पुरंदर नागरी सहकारी पतसंस्था मर्या, सासवड, मुख्य कार्यालय सासवड ता.पुरंदर, जि.पुणे यांच्या बोजाची रक्कम आणि त्यावरील व्याज याला अधिन राहावे लागेल.

परिशिष्ट 'अ'

जप्त केलेल्या परंतु प्रतीकात्मक ताबा घेतलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन

| अ. क्र. | लवादी थकबाकीदार/ सहकर्जदार जामीनदार नाव व पत्ता | दावा रक्कम, जप्ती दिनांक, ताबा दिनांक | गावाचे नांव तालुका जिल्हा | गट क्रमांक क्षेत्र आर | चर्तु:सिमा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.विजय जगन्नाथ वारागडे (लवादी थकबाकीदार) रो हाऊस नं ए/२/३५, सेक्टर-०५, खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड, श्री. जगन्नाथ दशरथ वारागडे श्री. रघुनाथ दशरथ वारागडे (सहकर्जदार) मु.पो.कोळविहिरे, ता.पुरंदर, जि.पुणे | दावा क्र. १०१/१६३७/०५/२०२३ दिनांक: २१/०४/२०२३ दावा रक्कम रू. ५,७०,२७२/- दिनांक.३१/१०/२०२२ अखेर जप्ती दिनांक.०९/१०/२०२३ ताबा दिनांक.११/०५/२०२६ | मौजे कोळविहिरे, ता.पुरंदर, जि.पुणे | गट क्र. १४८ मधील ०० हे. ३४ आर पैकी ०० हे १७ आर, सहकर्जदार १ व २ यांचे सामाईक क्षेत्र | **पुर्व :** श्री.शंकर राघोबा कोलते यांची शेतजमिन मिळकत **पश्चिम :** श्री.दादासो बापु नानेकर यांची शेतजमिन मिळकत **दक्षिण :** श्री.पंढरीनाथ घाटे यांची शेतजमिन मिळकत **उत्तर :** श्रीमती वैजयंता बापु नानेकर यांची शेतजमिन मिळकत |
| | | | | गट क्र.१५४ मधील ०० हे.११ आर, सहकर्जदार १ यांचे क्षेत्र | **पुर्व :** गट नं.१५३ **पश्चिम :** गट नं.१५५ **दक्षिण :** गट नं.१५७ **उत्तर गट :** नं.१६२ |
| | | | | गट क्र.१५५ मधील ०० हे.०७ आर, सहकर्जदार १ व २ यांचे सामाईक क्षेत्र | **पुर्व :** श्री.लक्ष्मण नारायण वारागडे यांची शेतजमिन मिळकत **पश्चिम :** श्री.अंकुश गेनबा वारागडे यांची शेतजमिन मिळकत **दक्षिण :** श्री.पंढरीनाथ घाटे यांची शेतजमिन मिळकत **उत्तर :** श्री. दादासो बापु नानेकर यांची शेतजमिन मिळकत |

सदरची ताबा नोटीस आज दि. ०४/०६/२०२६ रोजी माझ्या सही व कार्यालयीन मुद्रेसह दिली असे.

स्थळ : सासवड

दिनांक : ०४/०६/२०२६

शिक्का

सही/
(संतोष गुलाबराव पवार)
विशेष वसुली व विक्री अधिकारी, पुणे
द्वारा पुरंदर नागरी सहकारी पतसंस्था मर्या, सासवड
मुख्य कार्यालय सासवड ता. पुरंदर, जि.पुणे

## थोडक्यात पण महत्वाचे...



## अब्जावधींची उधळपट्टी करूनही उद्योगनगरीत पर्यावरणाचे वाटोळेच..!

पिंपरी (दैनिक संध्या) : 'स्वच्छ शहर, सुंदर शहर' अशी ख्याती मिळवू पाहणारे पिंपरी-चिंचवड शहर हे महाराष्ट्रातील सर्वाधिक वेगाने विकसित झालेले औद्योगिक तथा नागरी शहर आहे. वाहनउद्योग, आयटी कंपन्या, उद्योगधंदे, मोठे रस्ते, मेट्रो, उड्डाणपूल, गगनचुंबी इमारती अशा वेगवान विकासामुळे शहराचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलला आहे. मात्र, या विकासाच्या झगमगाटामागे पर्यावरणाची प्रचंड हानी झाली, हे लपून राहिलेले नाही. सद्यस्थितीत शहरातील प्रदूषणाची स्थिती गंभीर आहे. नद्यांची गटारे झाली आहेत. पर्यावरणाच्या दृष्टीने पिंपरी-चिंचवड अत्यंत धोक्याच्या वळणावर आहे. नदीपात्रात हजारोंच्या संख्येने आढळून येणारे मृत मासे, नदीत साचून राहणारी जलपर्णी, फेसाळलेली नदी, थेट नदीपात्रात सोडण्यात येणारे सांडपाणी, झाडांची कत्तल, नियोजनशून्य व भ्रष्ट कारभार हीच पिंपरी-चिंचवडच्या पर्यावरणाची ओळख बनली आहे. जवळपास ३० लाख लोकसंख्या असलेल्या उद्योगनगरीचा कारभार हाकणाऱ्या महापालिकेची वायूप्रदूषण, जलप्रदूषण, ध्वनी प्रदूषण, घनकचरा व्यवस्थापन अशा सर्वच बाबतीत असणारी प्रचंड उदासीनता, समन्वयाचा अभाव, फसवी घोषणाबाजी, कामापेक्षा चमकोगिरी जास्त, ही कार्यपध्दती आणि सातत्याने होणारे टक्केवारीचे राजकारण पाहिल्यानंतर शहरात पर्यावरणासारख्या महत्त्वाच्या विषयाचे बारा वाजले आहेत, हे कटू वास्तव स्वीकारावे लागते. पिंपरी पालिकेच्या वतीने पर्यावरणविषयक बाबींसाठी दरवर्षी कोट्यवधी रूपये खर्च केले जातात. गेल्या अनेक वर्षांच्या खर्चाची आकडेवारी पाहिल्यास पर्यावरणाच्या नावाखाली अब्जावधी रूपये खर्च झाले आहेत. या खर्चाच्या तुलनेत तितकी पर्यावरणविषयक कामे, सुधारणा कुठेच दिसत नाहीत. पर्यावरण संरक्षण, पर्यावरण संवर्धन, जनजागृती, वृक्षलागवड यासारख्या महत्त्वाच्या गोष्टी फक्त कागदावरच असल्याचे जाणवते. पर्यावरण दिनीच (५ जून) गाजावाजा केला जातो. नंतर 'पुढचे पाठ मागचे सपाट' नुसार सगळ्याचा विसर पडतो. वारकरी सांप्रदायाची तीर्थक्षेत्र मानल्या जाणाऱ्या देहू-आळंदीच्या कुशीत असणाऱ्या पिंपरी-चिंचवड शहरातून पवना, इंद्रायणी, मुळा नद्या वाहतात. सध्या या नद्यांची अवस्था गटारींना लाजवेल, अशी आहे. कोणतीही प्रक्रिया न करता थेट नद्यांमध्ये सांडपाणी सोडण्यात येते. अनेक कारखान्यांचे रसायनमिश्रीत पाणी रात्रीच्या अंधारात नदीत सोडले जाते. त्याची तीव्र दुर्गंधी परिसरात जाणवते. कंपन्यांच्या सांडपाण्यामुळे नदीचे संपूर्ण पात्र लालभडक झाल्याची, वारंवार नद्या फेसाळल्याची उदाहरणे आहेत. मात्र, हप्तेखोरीमुळे अशा कंपन्यांवर कारवाई होत नाही. नद्यांचे पाणी हातात घेऊ शकत नाही. इतके घाणेरडे पाणी नद्यांमध्ये आहे.

## महापालिकेत विविध अधिकाऱ्यांना अतिरिक्त कार्यभाराचे वाटप

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने प्रशासकीय कामकाजात अधिक सुसूत्रता, समन्वय आणि कार्यक्षमता राखण्याच्या दृष्टीने विविध विभागांतील अधिकाऱ्यांना अतिरिक्त कार्यभाराची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या अभिलेख कक्षाच्या प्रशासन अधिकारी उमा दरवेश यांच्याकडे स्थानिक संस्था कर विभागाच्या सहाय्यक आयुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. तसेच सामान्य प्रशासन विभागाचे प्रशासन अधिकारी गोरखनाथ लिमण यांच्याकडे ब क्षेत्रीय कार्यालयाच्या क्षेत्रीय अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. याशिवाय सामान्य प्रशासन विभागाचे कार्यालय अधीक्षक दत्ता सूर्यवंशी यांच्याकडे क्रीडा विभागाच्या प्रशासन अधिकारी पदाचा तर स्थानिक संस्था कर विभागाच्या कार्यालय अधीक्षक सरिता मारणे यांच्याकडे फ क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रशासन अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या स्वाक्षरीने याबाबतचे स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. महानगरपालिकेच्या विविध विभागांतील कामकाज सुरळीत, गतिमान आणि परिणामकारक पद्धतीने पार पाडण्यासाठी हे अतिरिक्त कार्यभार वाटप करण्यात आले असून, त्यामुळे प्रशासकीय कार्यक्षमता वाढण्यास आणि नागरिकांना अधिक प्रभावी सेवा देण्यास मदत होणार आहे.

# कोरिया-भारत संबंधासाठी पीसीयूचा कोसमे पुणे बेस कॅम्प महत्वपूर्ण

पिंपरी (दै. संध्या)

- कोरिया प्रजासत्ताक महावाणिज्य दूत डोंगवान यू
- पीसीयूची औद्योगिक विद्यापीठाच्या दिशेने वाटचाल - कुलपती हर्षवर्धन पाटील
- पीसीयू कोसमे पुणे बेस कॅम्प करार, एक मैलाचा दगड




स्वागत करताना कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी सांगितले की, पीसीयू मध्ये उद्योगाभिमुख शिक्षण, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), क्वांटम तंत्रज्ञान आणि इंडस्ट्री ४.० यांवर विशेष भर दिला जातो. कोसमे पुणे बेस कॅम्प हे कोरियन उद्योग आणि भारताच्या नवोन्मेष परिसंस्थेमधील दुवा म्हणून कार्य करणार असून यामुळे उद्योग, रोजगार क्षेत्रासाठी नव्या संधींची दारे खुली होणार आहेत असे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी सांगितले. स्टाराजीन कंपनीच्या सीईओ युजिन हान यांनी कोसमे आणि पीसीयू यांच्यातील सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या पहिल्या सामंजस्य करारापासून विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, एमआयडीसी सोबतचे संवाद, पुण्यातील कोरियन उद्योगांशी झालेल्या चर्चा आणि नवी दिल्ली येथे झालेला करार याची माहिती दिली. पीसीयूमध्ये आयोजित 'कोरिया बिझनेस कल्चर प्रोग्राम' या सहा आठवड्यांच्या विशेष प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या अनुभवांचे सादरीकरण केले. यामध्ये विद्यार्थ्यांना कोरियन व्यावसायिक संस्कृती, कार्यपद्धती, उद्योग, अपेक्षा आणि जागतिक करिअरच्या संधींबाबत प्रत्यक्ष अनुभवाधारित शिक्षण देण्यात आले होते. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे आणि अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रास्ताविक डॉ. रामदास बिरादार यांनी केले. सूत्र संचालन स्टाराजीन कंपनीच्या सीईओ युजिन हान यांनी केले. आभार डॉ. अनिल माहेश्वरी यांनी मानले.

भारत आणि दक्षिण कोरिया यांच्या मध्ये आर्थिक, औद्योगिक संबंध आणखी मजबूत आणि वृद्धिंगत होण्यासाठी पीसीयू आणि कोसमे यांच्या मध्ये झालेला सामंजस्य करार हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारतामध्ये कोरियातील लघु व मध्यम उद्योगांना सक्षम करण्यामध्ये कोसमे ची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. पीसीयू मध्ये कोसमे पुणे बेस कॅम्प हे देशातील एकमेव आहे. याचा उपयोग कोरियन भाषा प्रशिक्षण, प्राध्यापक देवाणघेवाण कार्यक्रम, विद्यार्थी कौशल्य विकास, संशोधन, स्टार्टअप इनक्युबेशन, कोरियन एसएमइ साठी उत्पादन चाचणी सुविधा आणि उद्योग शैक्षणिक सहकार्य असे विविध उपक्रम पीसीयू मध्ये सुरु करण्यासाठी होईल. यासाठी कोरियन सरकार देखील सकारात्मक आहे असे कोरिया प्रजासत्ताक महावाणिज्य दूत डोंगवान यू यांनी सांगितले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ येथे कोरिया एसएमइ स्टार्टअप एजन्सी (कोसमे) यांच्या संयुक्त विद्यमाने देशातील पहिल्या "कोसमे पुणे बेस कॅम्प"चे उद्घाटन कोरिया प्रजासत्ताक महावाणिज्य दूत डोंगवान यू आणि पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी एमआयडीसी प्रादेशिक अधिकारी नितीन गवळी, प्रादेशिक संचालक, विभागीय संचालक ईशान्य आशिया आणि एशियन कोसमे सुसोक पार्क, व्यवस्थापकीय संचालक कोसमे जीबीसी नवी दिल्ली जेक्यॉन्ग ली, मुख्य व्यापार प्रतिनिधी किटा योंग यून, संचालक सीईपीए नवी दिल्ली सेउंगचांग हा, कार्यकारी संचालक पीसीईटी डॉ. गिरीश देसाई, पीसीयूचे कुलगुरू संतोष सोनवणे, स्टाराजीन कंपनीच्या सीईओ युजिन हान, पीसीयू अधिष्ठाता डॉ. रामदास बिरादार, कुलसचिव डॉ. अनिल माहेश्वरी तसेच कोरियन कंपन्यांचे अधिकारी, प्रतिनिधी आदी उपस्थित होते. पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले की, पंतप्रधानांची विकसित भारताची संकल्पना पूर्ण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर शिक्षण, प्रशिक्षण, संशोधन आणि रोजगार विकासाला महत्व दिले पाहिजे. आता पीसीयू मधील कोरिया एसएमइ अँड स्टार्टअप एजन्सीच्या (कोसमे) भारतातील पहिल्या बेस कॅम्प मुळे महाराष्ट्रात कोरियन कंपन्यांच्या गुंतवणुकीचा वेग वाढेल. कोसमे पीसीयू करार म्हणजे विद्यार्थी, संशोधक, स्टार्टअप्स आणि उद्योग क्षेत्रासाठी एक मैलाचा दगड ठरेल. आगामी काळात देशाच्या अर्थव्यवस्थेवर याचा सकारात्मक परिणाम होईल. आता पीसीयूची वाटचाल भारतातील पहिले औद्योगिक विद्यापीठ होण्याच्या दिशेने सुरू झाली आहे त्याचा अभिमान वाटतो असे पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले. एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी नितीन गवळी यांनी कोसमे पुणे बेस कॅम्पच्या स्थापनेमुळे महाराष्ट्र हे कोरियन गुंतवणूक आणि उद्योग विस्तार, रोजगारासाठी चालना मिळेल. एमआयडीसी या केंद्राशी संबंधित कोरियन कंपन्यांना सर्वतोपरी सहकार्य करेल असे सांगितले. सुसोक पार्क यांनी सांगितले की, पुणे हे ऑटोमोबाईल, अभियांत्रिकी आणि नवोन्मेष क्षेत्रातील अग्रगण्य केंद्र म्हणून उदयास येत आहे. या माध्यमातून कोरियन उद्योगांना सक्षम करण्यासाठी आणि नवीन सहकार्याच्या संधी निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहू असे सांगितले.

## आळंदी मंदिरातील चोरीप्रकरणी संस्थानकडून मोठी कारवाई

पिंपरी (दै. संध्या)

संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीने आळंदी मंदिरातील चोरीप्रकरणी संबंधित कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई केली आहे. २२ मे २०२६ रोजी घडलेल्या घटनेनंतर संस्थान प्रशासनाने संबंधित कर्मचाऱ्यांकडून खुलासे मागवले होते. त्यानंतर २९ मे रोजी झालेल्या विश्वस्त मंडळाच्या बैठकीत या प्रकरणाचा आढावा घेऊन कारवाईचा निर्णय घेण्यात आला. संस्थान समितीने प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार, प्राथमिक निष्कर्षांच्या आधारे एका हंगामी सेवकाची सेवा तत्काळ समाप्त करण्यात आली आहे. तसेच रोखपाल आणि आचारी या दोघांना आरोपी विशाल वारुळे याच्यावरील पोलिस तपास पूर्ण होईपर्यंत निलंबित करण्यात आले आहे. याशिवाय संबंधित प्रकरणात व्यवस्थापनातील त्रुटी आढळून आल्याने प्रमुख व्यवस्थापकांना भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी सक्त ताकीद देण्यात आली आहे.

## सेवा कर भरण्यात झोपडपट्टीवासीयांचा सक्रीय पुढाकार

### दोन महिन्यात सुमारे ५० टक्के झोपडपट्टीवासीयांनी डिजिटल करप्रणालीद्वारे भरला सेवाकर

पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागामार्फत झोपडपट्टीधारकांकडून आकारण्यात येणाऱ्या सेवा कराच्या वसुलीस नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये एप्रिल व मे या दोन महिन्यांच्या कालावधीत झोपडपट्टीधारकांनी सेवा करापोटी एकूण १३ लाख ८१ हजार ८६९ रुपयांचा भरणा केला आहे. यामध्ये ऑफलाईन पद्धतीने ७ लाख ४६ हजार ४३५ रुपये तर ऑनलाइन पद्धतीने ६ लाख ३५ हजार ४३४ रुपयांचा कर जमा झाला आहे. झोपडपट्टीवासीय कर भरण्यामध्ये मागे नसून शहराच्या विकास प्रक्रियेत तेही सक्रिय सहभाग नोंदवत असल्याचे यावर्षीच्या कर संकलनातून स्पष्ट झाले आहे.

गेल्या काही वर्षांतील सेवा कर भरण्याची आकडेवारी पाहता झोपडपट्टीधारकांचा कर भरण्याबाबतचा सकारात्मक दृष्टिकोन सातत्याने दिसून येत आहे. आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये एप्रिल व मे महिन्याच्या कालावधीत ४ लाख ३३ हजार १६६ रुपये, २०२३-२४ मध्ये ९ लाख ६ हजार ९११ रुपये, २०२४-२५ मध्ये २ लाख २७ हजार ८६७ रुपयांचा सेवा कर जमा झाला होता. यावरून झोपडपट्टीधारक नागरिकांकडून सेवा कर भरण्यास सातत्याने प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येते.

विशेष म्हणजे, डिजिटल व्यवहारांना नागरिकांकडून वाढती पसंती मिळत असून सेवा कर भरण्यासाठी ऑनलाइन सुविधेचा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. चालू वर्षातील एकूण कर संकलनामध्ये ऑनलाइन भरण्याचे प्रमाण सुमारे ५० टक्के आहे. मागील काही वर्षांच्या तुलनेत ऑनलाइन कर भरण्याच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली असून नागरिक अधिकाधिक डिजिटल माध्यमांचा स्वीकार करत असल्याचे चित्र दिसून येत आहे. यामुळे नागरिकांचा वेळ वाचत असून कर भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि सोयीस्कर झाली आहे.

## १ हजार ८५८.२५ चौरस मीटर क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांवर निष्कासन कारवाई

पिंपरी (दै. संध्या)




पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'ग' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक २४, मौजे थेरगाव येथील लेमनट्री हॉटेल ते मोरया बँक्वेट हॉल दरम्यान सुरू असलेल्या रस्ता रुंदीकरण प्रकल्पाअंतर्गत अनधिकृत बांधकामांवर आज निष्कासनाची कारवाई करण्यात आली. 'ग' क्षेत्रीय कार्यालयाच्या अतिक्रमण निर्मूलन विभागामार्फत राबविण्यात आलेल्या या मोहिमेत एकूण ३० ठिकाणांवरील अनधिकृत बांधकामे हटविण्यात आली. या कारवाईमध्ये सुमारे १ हजार ८५८.२५ चौरस मीटर क्षेत्रफळावरील अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली. ही कारवाई महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशान्वये, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच 'ग' क्षेत्रीय अधिकारी मुकेश कोळप यांच्या अधिपत्याखाली पार पडली.

या कारवाईमध्ये उपअभियंता सुनील बेळगावकर व जयवंत रोकडे यांच्यासह महापालिकेच्या धडक कारवाई पथकातील 'ब', 'ड' व 'ग' क्षेत्रीय कार्यालयांचे १४ बीट निरीक्षक सहभागी होते. तसेच ४० एमएसएफ जवान, १ पोलीस उपनिरीक्षक, ९ पोलीस कर्मचारी, १० कंत्राटी मजूर, ७ मजूर कर्मचारी आणि ५ जेसीबी यंत्रांच्या सहाय्याने ही मोहीम यशस्वीपणे पूर्ण करण्यात आली. या कारवाईस शहरी दळणवळण विभाग, विद्युत विभाग, नगररचना विभाग तसेच इतर संबंधित विभागांचे सहकार्य लाभले.

> शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरक्षित, सुकर आणि गतिमान करण्यासाठी रस्ता रुंदीकरण महत्वाचे आहे. त्यामुळे या कामांमध्ये अडथळा ठरणारी अनधिकृत बांधकामे नियमानुसार हटविण्यात येत आहेत. नागरिकांच्या व्यापक हितासाठी आणि शहराच्या नियोजित विकासासाठी अशा कारवाया आवश्यक असून, सर्वांनी प्रशासनास सहकार्य करावे. पिंपरी चिंचवड शहरातील रस्ते, पायाभूत सुविधा आणि दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध आहे.
>
> **– डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

## पावणेतीन लाखांचे मोबाईल चोरल्याप्रकरणी कर्मचाऱ्यांना अटक

पिंपरी (दै. संध्या)



आकुर्डी येथील इलास्टिक रन कुरिअर कंपनीच्या स्टॉकमधून २ लाख ७५ हजार रुपयांहून अधिक किमतीचे मोबाइल चोरल्याप्रकरणी दोन कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. ऋषिकेश राम कनमुसे (२०, रा. चिखली) आणि ओमकार विष्णू शिंगाडे (१९, रा. निगडी) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी कंपनीचे अधिकारी रजत अभयकुमार वाव्हाळ (२८, रा. वाकड) यांनी निगडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी १ ते ३१ मे २०२५ या कालावधीत संगनमत करून कंपनीच्या स्टॉकमधील महागडे मोबाइल लंपास केले. स्टॉक तपासणीदरम्यान मोबाइल गायब असल्याचे निदर्शनास आल्यानंतर चौकशी करण्यात आली. त्यात आरोपींचा सहभाग उघड झाला. पोलिसांनी दोघांना अटक केली आहे.

# "अंतर्मनीचे भाव तरंग" या ईबुक काव्यसंग्रहाचे प्रकाशन संपन्न

पिंपरी (दै. संध्या)



३ जून रोजी ज्येष्ठ कवी बाबू डिसोजा यांच्या लग्नाची ४४ वर्षे पूर्ण झाली म्हणून त्यांच्या "अंतर्मनीचे भाव तरंग" या प्रथम ईबुक काव्यसंग्रहाचे प्रकाशन संपन्न झाले.

त्यांची तब्येत ठीक नसल्याने त्यांच्या अनिका पिकॅडिली सोसायटी च्या निवासस्थानी झालेल्या घरगुती स्वरूपात ई बुक चे प्रकाशन केले.त्याची पत्नी सौ.माधुरी आणि मुले डॉ.अभिनंदन, ज्येष्ठ स्नुषा उद्योजिका सौ.सुप्रिया, डॉ.साईप्रसाद, इंजि. सौ.पूजा आणि नातवंडे कु.हेरंब,कु.इरा यांनी सहभाग घेतला. मा.प्रा. डॉक्टर धनंजय भिसे यांनी या पुस्तकाविषयी आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले की,"अंतर्मनीचे भाव तरंग : संवेदनशील मनाच्या स्पंदनांचा काव्यमय आविष्कार" आहे.

मराठी साहित्यविश्वात आपल्या संवेदनशील काव्यलेखनाने, वैचारिक लेखनाने आणि मुक्त पत्रकारितेच्या माध्यमातून स्वतंत्र ओळख निर्माण करणारे ज्येष्ठ साहित्यिक बाबू फिलीप डिसोजा कुमठेकर यांचा 'अंतर्मनीचे भाव तरंग' हा काव्यसंग्रह मानवी मनातील अनुभूती, भावभावना, विचार आणि जीवनदृष्टी यांचा समृद्ध शब्दाविष्कार आहे. हा संग्रह केवळ कवितांचा संच नाही, तर एका संवेदनशील मनाने जीवनाच्या विविध अंगांना दिलेला अर्थपूर्ण प्रतिसाद आहे. दौंड येथे २१ ऑक्टोबर १९५५ रोजी जन्मलेल्या बाबू कुमठेकर यांनी बँकिंग क्षेत्रात शाखा व्यवस्थापक म्हणून जबाबदारी पार पाडताना साहित्याची अखंड साधना जपली. कवितालेखन, स्तंभलेखन आणि मुक्त पत्रकारिता या क्षेत्रांत त्यांनी केलेले कार्य त्यांच्या सामाजिक जाणिवेची आणि वैचारिक प्रगल्भतेची साक्ष देते. 'शब्दझुला', 'आवर्त', 'आशय' आणि 'अस्वस्थ वर्तमानातील मी' या त्यांच्या पूर्वप्रकाशित काव्यकृतींमधून समकालीन वास्तवाचा शोध घेणारा आणि मानवी मूल्यांशी निष्ठावान राहणारा कवी आपल्याला भेटतो. 'अंतर्मनीचे भाव तरंग' हा संग्रह त्या साहित्यप्रवासातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरतो.

> "बाबू सरांना 44व्या लग्नवाढदिवसाच्या व ई-काव्यसंग्रह प्रकाशनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांच्या लेखणीला असेच बळ मिळो आणि त्यांच्या भावतरंगांनी वाचकांची मने जिंकत राहोत, हीच सदिच्छा." "44 वर्षांच्या सुखी संसारासोबत शब्दांचीही यशस्वी साथ! बाबू डिसुजा सरांच्या 'अंतर्मनीचे भाव तरंग' या पहिल्या ई-काव्यसंग्रहास व लग्नवाढदिवसास हार्दिक शुभेच्छा. निवृत्तीनंतरही लेखणीतून समाज प्रबोधन करणारे डिसुजा सर खऱ्या अर्थाने युवकांसाठी आदर्श आहेत."

या संग्रहातील सुमारे ऐंशी कविता विविध विषयांना स्पर्श करतात. प्रेम, माणुसकी, निसर्ग, सामाजिक जाणीव, अध्यात्म, राष्ट्रप्रेम, भाषा-अस्मिता, सामाजिक परिवर्तन, दातृत्व आणि जीवनमूल्ये यांचे बहुआयामी दर्शन या कवितांतून घडते. कवीची भाषा अलंकारिकतेच्या अतिरेकात न जाता साधी, सहज आणि हृदयस्पर्शी आहे. त्यामुळे कविता थेट वाचकांच्या भावविश्वाशी संवाद साधतात.

'दातृत्व' ही कविता या संग्रहातील मूल्यप्रधान कवितांपैकी एक महत्त्वाची रचना आहे. दान ही केवळ संपत्तीची उधळण नसून ती मानवतेची सर्वोच्च अभिव्यक्ती आहे, हा संदेश कवी अत्यंत साध्या पण परिणामकारक शब्दांत मांडतो. निष्काम सेवा, परोपकार, जनकल्याण आणि धर्मपालन यांचा सुंदर समन्वय या कवितेत दिसून येतो. दानामागील नैतिक तत्त्वज्ञान उलगडत ही कविता वाचकाला अधिक संवेदनशील आणि सामाजिकदृष्ट्या उत्तरदायी बनवते.

'देशप्रेमी क्रांतीकारक' ही कविता भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील अमर हुतात्म्यांच्या त्यागाचे स्मरण करून देणारी प्रेरणादायी रचना आहे. राष्ट्रभक्ती, बलिदान, स्वातंत्र्याची तळमळ आणि कर्तव्यनिष्ठा यांसारख्या मूल्यांचे प्रभावी चित्रण या कवितेत आढळते. ही कविता इतिहासाचे केवळ पुनर्कथन करत नाही, तर नव्या पिढीच्या मनात देशप्रेमाची ज्योत प्रज्वलित करते.

संग्रहातील सर्वाधिक विचारप्रवर्तक कवितांपैकी 'धर्म लेखणीचा' ही कविता विशेष उल्लेखनीय आहे. समाजातील अंधश्रद्धा, विषमता, अन्याय आणि कालबाह्य रूढींवर प्रहार करण्याचे सामर्थ्य लेखणीत आहे, यावर कवीचा दृढ विश्वास आहे. साहित्यिकाची भूमिका केवळ मनोरंजनापुरती मर्यादित नसून ती सामाजिक परिवर्तनाची प्रेरक शक्ती असली पाहिजे, असे या कवितेतून प्रतिपादित होते. लेखणीला परिवर्तनाचे शस्त्र मानणारी ही कविता साहित्यिकाच्या सामाजिक उत्तरदायित्वाची प्रभावी घोषणा ठरते. 'भाषा संस्कार' ही कविता मराठी भाषेबद्दलचा आत्मीय अभिमान व्यक्त करणारी हृदयस्पर्शी रचना आहे. मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून संस्कारांची, अस्मितेची आणि सांस्कृतिक परंपरेची वाहक आहे, ही भावना कवी अत्यंत उत्कटतेने व्यक्त करतो. मातृभाषेला मायमाऊलीचे रूप देत तिच्या वात्सल्यपूर्ण स्पर्शाचा अनुभव देणारी ही कविता मराठी भाषेच्या गौरवगीतासारखी वाटते. 'बसवण्णा' या कवितेत कवीने महान समाजसुधारक, तत्त्वज्ञ आणि मानवतावादी विचारवंत बसवेश्वर यांच्या कार्याचा सारगर्भित गौरव केला आहे. समता, श्रमप्रतिष्ठा आणि मानवमुक्तीच्या विचारांना अभिव्यक्त करणारी ही कविता समाजपरिवर्तनाच्या चळवळींच्या ऐतिहासिक परंपरेचे स्मरण करून देते.

या संग्रहाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे कवीच्या संवेदनशील मनाचा व्यापक आवाका. दैनंदिन जीवनातील साध्या घटनांमध्येही ते जीवनाचे गूढ, सौंदर्य आणि मूल्ये शोधतात. त्यांच्या कवितांमध्ये आशावाद आहे, सकारात्मकतेची ऊर्जा आहे आणि मानवी नात्यांबद्दलची अपार आस्था आहे. म्हणूनच या कविता वाचकाला केवळ भावनिक अनुभव देत नाहीत, तर विचारप्रवृत्तही करतात. बाबू कुमठेकर यांच्या साहित्याला संगीतविश्वानेही दिलेली दाद उल्लेखनीय आहे. 'शब्दझुला' मधील गीतांना ज्येष्ठ गायिका चारुशीला बेलसरे, सुप्रसिद्ध गायक रविंद्र साठे यांसारख्या नामवंत कलाकारांनी स्वर दिले आहेत. त्यांच्या भक्तिगीतांनी महाराष्ट्रातील धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांत लोकप्रियतेचे शिखर गाठले आहे. ही लोकमान्यता त्यांच्या लेखणीच्या सामर्थ्याचीच साक्ष देते. एकूणच, 'अंतर्मनीचे भाव तरंग' हा काव्यसंग्रह संवेदनशील मनाच्या स्पंदनांचा, जीवनानुभवांच्या गहिऱ्या जाणिवांचा आणि मानवी मूल्यांच्या शोधाचा एक समृद्ध दस्तऐवज आहे. या संग्रहातील कविता वाचकाला अंतर्मुख करतात, सामाजिक भान जागृत करतात आणि जीवनाकडे अधिक व्यापक, मानवी आणि सकारात्मक दृष्टीने पाहण्याची प्रेरणा देतात. मराठी काव्यसाहित्यात मोलाची भर घालणारा हा संग्रह रसिक वाचकांसाठी एक भावसमृद्ध आणि विचारप्रवर्तक साहित्यिक अनुभव ठरतो.

तर मा.संतोष काळे मुख्याध्यापक, श्री टागोर माध्यमिक विद्यालय आणि कार्याध्यक्ष, पिंपरी चिंचवड मुख्याध्यापक संघ याप्रसंगी शुभेच्छा देताना म्हणाले की"आदरणीय बाबू फिलीप डिसुजा सर यांच्या वैवाहिक जीवनाला उद्या 44 वर्षे पूर्ण होत आहेत, हा क्षण खरंच दुहेरी आनंदाचा आहे. संसाराचा गोड प्रवास यशस्वी करतानाच त्यांनी आपल्या लेखणीतून समाजमनाला स्पर्श करणारे साहित्य निर्माण केले. 'अंतर्मनीचे भाव तरंग' हा त्यांचा पहिला ई-काव्यसंग्रह म्हणजे त्यांच्या 44 वर्षांच्या सहजीवनातील अनुभव, संवेदना आणि अंतर्मनात उमटलेले तरंगच आहेत. बँकेच्या सेवेतून निवृत्त झाल्यानंतरही शब्दांची सेवा अखंडपणे सुरू ठेवणे ही बाब सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. 'शब्दझुला', 'आवर्त', 'आशय' नंतर आता ई-बुकच्या माध्यमातून ते नव्या पिढीपर्यंत पोहोचत आहेत, हे विशेष कौतुकास्पद.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### ओंकार जराड युवकाची पोलीस पदी निवड

दौंड (दैनिक संध्या) : दौंड तालुका कानगाव ओकार रविंद्र जराड राहणार गणेश नगर(खोरपट्टा या युवकाची महाराष्ट्र पोलीस एस, आर,पी,पदी नुक्तीच निवड झाली आहे घरची परिस्थिती व्यवसाय -जराड कृषी सेवा केंद्र कानगाव सौ.रोहीणी रविंद्र जराड(आई)गृहीणी व श्रद्धा लेडिज शॉप ओंकारचे शिक्षण-जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गणेशवाडी कानगाव आदर्श विद्यालय कानगाव-दहावी पर्यंत जवाहरलाल विद्यालय केडगाव-अकॅडमी करत ग्रॅज्युएशन पुर्ण. समर्थ अकॅडमी केडगाव एक वर्ष कोरोना काळात दोन वर्षे गेली महागणपती अकॅडमी रांजणगाव चार वर्षे सतत अगदी यशाचा निकट जाऊन पदरी अपयश येत होते. अफाट जिद्द, परिश्रम, अभ्यास करुन अपयशालाच पायरी करुन हे यश वयाच्या २३व्या वर्षी संपादन केले.

### चाकण येथे रविवारी रक्तदान शिबिर

चाकण (दैनिक संध्या) : रक्ताचा तुटवडा भासू नये व रक्तदान शिबिराच्या माध्यमातून एखाद्या व्यक्तीचे प्राण वाचू शकते, हा हेतू डोळ्यासमोर ठेवून चाकण येथे रविवारी (दि.७ जुन) भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. येथील मुटकेवाडीतील मांजरे कॉम्प्लेक्स मध्ये रविवारी सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळात या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती उद्योजक बाळासाहेब मांजरे व राजगुरुनगर सहकारी बँकेचे संचालक सचिन मांजरे यांनी दिली. फोकस फिटनेस जिम, सचिनदादा किरणशेठ मांजरे मित्र परिवार व रोटरी क्लब ऑफ चाकण एअरपोर्ट आदींच्या संयुक्त विद्यमाने या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रक्तदान शिबिरात रक्तदान करणाऱ्या रक्तदात्यांना यावेळी भेट वस्तूंसह सहभागाबद्दलचे प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. अपघात ग्रस्तांचे प्राण वाचण्यासाठी रक्ताची गरज असते. रक्ताचा एक थेंब माणसाचा जीव वाचू शकतो. त्यामुळे रक्तदान शिबिरात तरुण व तरुणींनी रक्तदान करून समाजापुढे आदर्श निर्माण करण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे येथील भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालयात दुपारी बारा ते दोन या वेळात ह.भ.प. धर्माचार्य शंकर महाराज शेवाळे यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. चाकणकर नागरिकांनी रविवारी अन्नप्रसाद व श्रवण सुखाचा लाभ घेण्याचे आवाहन बाळासाहेब मांजरे व सचिन मांजरे यांनी केले आहे.

### चाकण येथे रविवारी स्व. किरणशेठ मांजरे स्मृती गौरव पुरस्काराचे वितरण



चाकण (दैनिक संध्या) : माणसातला देव माणूस म्हणून नावलौकिक मिळविलेले पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य स्व. किरणशेठ मांजरे स्मृती गौरव पुरस्काराचे वितरण चाकण येथे रविवारी (दि.७) करण्यात येणार आहे.समाजात चांगले काम करणाऱ्या व्यक्तींना पुरस्काराच्या माध्यमातून प्रोत्साहन मिळावे म्हणून विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना रविवारी आयोजित करण्यात येणाऱ्या एका पुरस्कार वितरण सोहळ्यात हे पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. पुणे - नाशिक महामार्गावरील चाकण गावच्या हद्दीतील भाग्य लक्ष्मी मंगल कार्यालयात रविवारी दुपारी एक वाजता हा सोहळा संपन्न होणार आहे. पर्यावरण संवर्धन क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करणाऱ्या सपना हिराचंद राठोड यांना पर्यावरण संवर्धन पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. वृक्ष लागवड व पर्यावरण संरक्षणात विशेष योगदान देणारे अनंत तायडे यांना पर्यावरण संरक्षक पुरस्कार दिला जाणार आहे. उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे चाकण येथील उद्योजक राजेंद्र दत्तात्रय गोरे यांना उद्योग महर्षी पुरस्कार, तसेच सलग तीस वर्ष राजगुरुनगर सहकारी बँकेवर निवडून येत असलेल्या विजया रामदास शिंदे यांना सहकार महर्षी पुरस्कार दिला जाणार आहे. शिष्यवृत्ती व इतर स्पर्धा परीक्षांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची निवड होत असल्याबद्दल आणि त्यासाठी योगदान देणारे राजेंद्र महादेव गारगोटे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार दिला जाणार आहे. आदर्श कुटुंब प्रमुख पुरस्कार खराबवाडीचे माजी उपसरपंच प्रकाश खराबी यांना तर, समाज प्रबोधनकार धर्माचार्य ह.भ.प. शंकर महाराज शेवाळे यांना समाज प्रबोधन पुरस्कार देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे अडीच एकरात ट्रॅक्टर फवारणीसह स्वतः द्राक्ष पिक घेणाऱ्या तेजश्री सुशील साळुंखे यांची कृषीनिष्ठ पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याची माहिती राष्ट्रीय उद्योजक रत्न पुरस्कार विजेते बाळासाहेब मांजरे व राजगुरुनगर बँकेचे संचालक सचिन मांजरे यांनी दिली.

### कात्रज घाटात संरक्षक भिंती ढासळल्या; नागरिकांचा जीव धोक्यात

कात्रज (दैनिक संध्या) : स्वारगेट-सातारा महामार्गावरील जुन्या कात्रज घाटात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांच्या जिवाशी खेळ सुरू असल्याचे चित्र समोर आले आहे. घाटातील अनेक ठिकाणच्या संरक्षक भिंती पूर्णपणे ढासळलेल्या अवस्थेत असून, गेल्या अनेक महिन्यांपासून हा गंभीर प्रश्न प्रलंबित आहे. मात्र, संबंधित विभागाकडून केवळ पाहणी केली गेली असून, प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. पावसाळा तोंडावर आला असताना घाटातील ही धोकादायक परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. मुसळधार पावसामुळे ढासळलेल्या भागात भूस्खलन किंवा वाहन दरीत कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरीही प्रशासनाने या प्रश्नाकडे काणाडोळा केल्याने नागरिकांमध्ये तीव संताप व्यक्त होत आहे. मांगडेवाडीच्या पुढे हॉटेल माऊली, हॉटेल हवेली आणि के-72 या परिसरात रस्त्यालगतच्या संरक्षक भिंती कोसळल्या आहेत. या ठिकाणी नैसर्गिक ओढा, खोल दरी असून, एखादे वाहन नियंत्रण सुटल्यास थेट दरीत कोसळण्याचा धोका आहे. विशेषतः रात्री प्रकाशाची अपुरी व्यवस्था आणि ढासळलेले कठडे, यामुळे अपघाताची शक्यता अधिक वाढली आहे. केवळ भिंतीच नव्हे, घाटातील सर्वच यंत्रणा कोलमडल्याचे विदारक चित्र दिसत आहे. कात्रज घाटातील पावसाळी पाणी वाहून नेणारी गटारे, दिशादर्शक फलक, इशारा फलक, रस्त्याकडील सुरक्षा भिंतींची रंगरंगोटी आणि इतर सुरक्षाविषयक उपाययोजना गेल्या अनेक वर्षांपासून दुर्लक्षित आहेत. त्यामुळे घाटातील वाहनचालकांचे जीव धोक्यात आले असून, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वीच संरक्षक भिंतींचे काम युद्धपातळीवर पूर्ण करणे आवश्यक असताना सार्वजनिक बांधकाम विभाग मात्र कुंभकर्णी झोपेत असल्याची टीका नागरिक करीत आहेत. एखादी मोठी दुर्घटना घडून निष्पाप नागरिकांचा बळी गेल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का? असा संतप्त सवाल परिसरातून उपस्थित केला जात आहे. स्थानिक नागरिक आणि लोकप्रतिनिधींनी वारंवार तक्रारी करूनही विभागाचे अधिकारी केवळ पाहणी करून परतले. 'काम तातडीने सुरू करू,' अशी आश्वासने देण्यात आली. मात्र, दोन महिन्यांहून अधिक काळ उलटूनही एकही वीट हललेली नाही. अधिकाऱ्यांच्या या ढिसाळ कारभारामुळे नागरिकांचा संयम संपत चालला आहे.

# पालखी सोहळ्याचे वेळापत्रक जाहीर

## ७ जुलैला होणार पंढरपूरकडे प्रस्थान, यंदा वारीत काय असणार विशेष?




**'पालखी रथ नवीन करण्याचा मानस'**

यंदाच्या पालखी सोहळा प्रमुखपदी विक्रमसिंह महाराज मोरे, लक्ष्मण महाराज मोरे, उमेश महाराज मोरे यांची निवड संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे यांनी बुधवारी (ता. ३) जाहीर केली. संत तुकाराम महाराज संस्थानच्या वतीने पालखी रथ आणि चौघडा वाहनास जुंपण्यासाठी तीन बैलजोडींची खरेदी करणार आहे. तसेच नवीन चांदीचा रथाचे काम सुरू आहे, असेही पालखी सोहळा प्रमुख मोरे यांनी सांगितले.

**देहू (दै. संध्या)**

आषाढी वारीसाठी संत तुकाराम महाराज पालखी सोहळा सात जुलै रोजी देहूतून पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार (Sant Tukaram Maharaj Palkhi 2026) आहे, अशी माहिती संत तुकाराम महाराज संस्थानचे पालखी सोहळा प्रमुख विक्रमसिंह महाराज मोरे यांनी दिली.

संस्थानचे अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे, पालखी सोहळा प्रमुख लक्ष्मण महाराज मोरे, उमेश महाराज मोरे, विश्वस्त दिलीप महाराज मोरे आदी उपस्थित होते. मोरे म्हणाले, "सात जुलै रोजी दुपारी दोनच्या सुमारास पालखी सोहळ्याचे देहूतील देऊळवाड्यातून प्रस्थान होईल. पहिल्या दिवशी पालखी देहूतील इनामदारवाड्यात मुक्कामी असेल. ८ जुलै रोजी पालखीचा इनामदारवाड्यातून निघून आकुर्डीत मुक्काम असेल. ९ जुलै रोजी सोहळा पिंपरी, कासारवाडीमार्गे पुण्यात नाना पेठेतील निवडुंगा विठ्ठल रुक्मिणी मंदिरात दोन दिवस मुक्कामी राहील. ११ जुलैला हडपसरमार्गे लोणीकाळभोर येथे कदमवाकवस्ती नवीन पालखी तळावर मुक्कामी जाईल. १२ जुलैला सोहळा यवत, १३ जुलैला वरवंड येथे, १४ जुलै रोजी सोहळा उंडवडी गवळ्याची येथे तर १५ जुलैला बारामतीत मुक्काम करेल. १६ जुलै रोजी पालखी सणसर येथे मुक्कामी असेल. काटेवाडी येथे मेंढ्याचे रिंगण होईल. १७ जुलै रोजी बेलवाडीत सोहळ्यातील पहिले गोल रिंगण होईल. त्यानंतर पालखी निमगाव केतकीत मुक्काम करेल. १८ जुलैला इंदापूर येथे दुसरे गोल रिंगण करून मुक्काम करेल. १९ जुलै रोजी पालखी सराटी मुक्कामी असेल. २० जुलै रोजी सोहळा नीरा स्नानानंतर अकलूज येथे तिसरे गोल रिंगण होईल. २१ रोजी माळीनगर येथे पहिले उभे रिंगण होणार आहे. त्यानंतर सोहळा बोरगाव मुक्कामी जाईल. २२ जुलैला दुपारी तोंडले बोंडले येथे धावा होईल. पालखी पिराची कुरोली येथे मुक्कामी राहणार आहे. २३ जुलैला वाखरीजवळील बाजीराव विहीर येथे दुसरे उभे रिंगण होईल. त्यानंतर वाखरीत मुक्काम असेल. २४ जुलै रोजी पादुका अभंग आरती, उभे रिंगण झाल्यानंतर सोहळा पंढरपुरातील संत तुकाराम महाराजांच्या नवीन मंदिरात मुक्कामी जाईल.

## अधिक मास निमित्त श्री स्वामी मंदिरात धार्मिक उपक्रम



**जेजुरी (दै. संध्या)**

तीर्थक्षेत्र जेजुरी नगरीतील श्री स्वामी समर्थ मंदिरात अधिक मास निमित्त सामूहिक सत्यनारायण पूजा व धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले होते. जेजुरी शहरातील श्री स्वामी समर्थ मंदिरात स्वामी भक्तांच्या वतीने या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी 33 जोडप्यांच्या वतीने सत्यनारायण पूजा , अभिषेक पूजा, महाप्रसाद आदी विधी करण्यात आले. वेदमूर्ती शशिकांत सेवेकरी, पुरोहित महेश देशपांडे यांनी या धार्मिक विधी केले यावेळी मोठ्या संख्येने स्वामी भक्त उपस्थित होते.

## सराईत गुन्हेगार वर्षासाठी तडीपार

**दौंड (दै. संध्या)**

दौंड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार अमोल शंकर विटकर (रा. बोरावकेनगर, दौंड) आणि असीम कासिम उर्फ असिफ कासम कुरेशी (रा. खाटीक गल्ली, दौंड) यांना एक वर्षाच्या कालावधीसाठी तडीपार करण्यात आले आहे. दोन्ही आरोपींविरुद्ध यापूर्वी शरीराविरुद्धचे गुन्हे, नागरिकांमध्ये भीती व दहशत निर्माण करणे, धमकावणे तसेच कायदा व सुव्यवस्थेला बाधा निर्माण करणाऱ्या विविध गंभीर स्वरूपाच्या घटनांची नोंद दौंड पोलीस ठाण्यात करण्यात आली होती.

याशिवाय असीम कासिम उर्फ असिफ कासम कुरेशी याच्याविरुद्ध गोवंशाशी संबंधित कायद्यांचे उल्लंघन करून धार्मिक भावना दुखावल्याचेही अनेक गुन्हे दाखल आहेत. या दोन्ही आरोपींच्या सातत्यपूर्ण गुन्हेगारी कृत्यांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असून सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्थेवर विपरीत परिणाम होत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले होते. त्यानुसार महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये त्यांच्याविरुद्ध तडीपार कारवाईचा प्रस्ताव उपविभागीय दंडाधिकारी, दौंड यांच्याकडे सादर करण्यात आला होता. या प्रस्तावावर सुनावणी झाल्यानंतर उपविभागीय दंडाधिकारी रेवनाथ लबडे यांनी अमोल शंकर विटकर आणि असीम कासिम उर्फ असिफ कासम कुरेशी या दोघांना पुणे शहर पोलीस आयुक्तालय व महानगरपालिका हद्दीसह पुणे, सोलापूर, सातारा आणि अहिल्यानगर जिल्ह्यांच्या हद्दीतून पुढील एक वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश दिले आहेत.

## मोडी लिपी तज्ज्ञ अभ्यास समितीवर आंबळे गावातील संदीप बेंद्रे

**कोळवण (दै. संध्या)**



'राज्य शासनाच्या समितीवर मोडी तज्ज्ञ म्हणून झालेली निवड हा माझ्यासाठी एक बहुमान आहे. ज्येष्ठ इतिहास संशोधक संदीप तिखे सर यांच्या मार्गदर्शनामुळे मला मोडी लिपी वाचन व लेखनात गती मिळाली व राज्यस्तरावर संधी मिळाली खरंतर हे एक आव्हानात्मक काम आहे. मिळालेल्या संधीद्वारे मी अधिकाधिक मोडी कागदपत्रांवर संशोधन करून अप्रकाशित इतिहास उजेडात आणण्याचा प्रयत्न करणार आहे.'

**- संदीप बेंद्रे, नवनियुक्त सदस्य, तज्ज्ञ समिती मोडी लिपी अभ्यासक महाराष्ट्र शासन.**

शिरूर येथील आंबळे गावातील संदीप विलास बेंद्रे यांची राज्य शासनाच्या मोडी लिपीतील मजकुराचे मराठी व इंग्रजी भाषांतर करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीवर नियुक्ती करण्यात आली आहे. जानेवारी २०२६ मध्ये झालेल्या परीक्षेत त्यांनी ८१ टक्क्यांहून अधिक गुण मिळवत यश संपादन केले आहे. देशभरात मोडी लिपीतील ८० कोटीहून अधिक कागदपत्रे आहेत परंतू पुरेसे मोडी तज्ज्ञ नसल्याने हा इतिहास कागदपत्रात बंदिस्त आहे. या इतिहासावर प्रकाश टाकण्यासाठी राज्य सरकारने विशेष मोहिम हाती घेतली असून याचाच भाग म्हणून भाषा संचालनालयाने मोडी वाचकांची लेखी व तोंडी परीक्षा घेऊन पात्र उमेदवारांची यादी राज्य सरकार कडे पाठविली. राज्य शासनाने त्यातील ३० मोडी तज्ज्ञांची एक समिती तयार केली या समितीवर बेंद्रे यांची निवड करण्यात आली आहे. बेंद्रे यांनी यापूर्वीही पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या मोडी परीक्षेत यश मिळवले आहे. मोडी लिपीतील प्रशासकीय, कायदेविषयक, महसूल, शैक्षणिक व अभियांत्रिकी अभिलेखांचे मराठी आणि इंग्रजी भाषांतर करण्यासाठी तज्ज्ञांची विस्तृत समिती स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार राज्य शासनाच्या भाषा संचालनालयाने ८ मे २०२६ च्या पत्रान्वये हा प्रस्ताव मंजूर केला आहे. या समितीच्या माध्यमातून भविष्यात विविध प्रशासकीय व ऐतिहासिक मोडी दस्तऐवजांचे अचूक भाषांतर करण्याचे काम केले जाणार असून, शासनाने याबाबत परिपत्रकाद्वारे माहिती दिली आहे.

बेंद्रे हे ग्रामीण भागात मोडी लिपीचा प्रसार होण्यासाठी मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग आयोजित करतात त्यांचे अनेक विद्यार्थी मोडी लिपी कागदपत्रांवर संशोधन करत आहेत. राज्य समितीवर मोडी अभ्यासक म्हणून नियुक्ती झाल्या बद्दल शिरूर तालुक्यातून त्यांच्या वर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

## आंबेगावात अवकाळी पाऊस व वादळाचा तडाखा

**पारगाव (दै. संध्या)**

■ कांदा, शेती आणि मालमत्तेचे मोठे नुकसान



वादळी वाऱ्यामुळे बेट परिसरातील अनेक लिंबाची झाडे उन्मळून पडली आहेत. तसेच, संस्थेच्या कार्यालयावरील पत्रे उडून गेल्याने कार्यालयीन व्यवस्थेचेही नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त भागाची महसूल प्रशासनाने तातडीने पाहणी करून पंचनामा करावा, तसेच झालेल्या नुकसानीची भरपाई शासनामार्फत द्यावी, अशी मागणी श्री सद्गुरू नारायण महाराज बेट संस्थेच्या वतीने करण्यात आली आहे.


आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील चांडोली बुद्रुक-खडकी परिसरात मंगळवारी (दि. 2) दुपारी चक्रीवादळासह जोरदार गारांचा पाऊस झाल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. अचानक झालेल्या या अवकाळी पावसामुळे कांदा साठवणुकीसाठी उभारलेल्या अनेक बराक्यांमध्ये पाणी शिरून हजारो क्विंटल कांदा भिजला आहे. या परिसरातील शेतकऱ्यांनी कांदा साठवणुकीसाठी लाकडी बराक्या उभारल्या असून, त्यावर शेडनेट व वैरणीचे आच्छादन केले होते. मात्र, चक्रीवादळाच्या तीव वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी शेडनेट उडून गेले किंवा फाटले. त्यानंतर झालेल्या मुसळधार पावसामुळे बराक्यांमध्ये पाणी शिरून कांदा भिजला. खडकी फाटा येथील शेतकरी सुरेश दामोदर वाबळे यांनी लाकडी बराकीत 400 कांद्याच्या पिशव्या साठवून ठेवल्या होत्या. वादळामुळे बराकीवरील शेडनेट उडून गेल्याने पावसाचे पाणी थेट कांद्यावर पडले. परिणामी संपूर्ण कांदा भिजून त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. भिजलेल्या कांद्याची गुणवत्ता घसरण्याबरोबरच तो सडण्याचीही भीती व्यक्त केली जात आहे. यंदा कांदा उत्पादकांना सुरुवातीपासूनच कमी बाजारभावाचा फटका बसत आहे. अपेक्षित दर मिळत नसल्याने उत्पादन खर्चही वसूल करणे कठीण झाले आहे. त्यातच अवकाळी पाऊस, गारपीट आणि चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांच्या अडचणी अधिक वाढल्या आहेत. कमी बाजारभाव, वाढलेला उत्पादन खर्च आणि निसर्गाच्या लहरीपणामुळे कांदा उत्पादक दुहेरी संकटात सापडले आहेत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी तातडीने पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शासनाकडे केली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून कांद्याला अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. त्यातच चक्रीवादळासह झालेल्या पावसामुळे साठवलेला कांदा भिजल्याने नुकसान वाढले आहे. त्यामुळे कांदा उत्पादकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, शासनाकडून तातडीच्या मदतीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

देऊळगाव गाडा परिसरातील श्री सद्गुरू नारायण महाराज बेट परिसराला मंगळवारी (दि. 2) झालेल्या अवकाळी पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्याचा मोठा फटका बसला. पहिल्याच पावसात शेती, झाडे तसेच संस्थेच्या मालमत्तेचे नुकसान झाल्याने भाविक आणि परिसरातील नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. याबाबत माहिती देताना श्री सद्गुरू नारायण महाराज बेट संस्थेचे प्रमुख विश्वस्त संजय शितोळे यांनी सांगितले की, संस्थेच्या मालकीची शेती हा उपजीविकेचा प्रमुख आधार असून, मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. शेतातील उभी पिके जमीनदोस्त झाली असून, त्यामुळे संस्थेला मोठा आर्थिक फटका बसला आहे.

## खडकवासला-पानशेत परिसरात वन्यजीवांचा मुक्त संचार


**खडकवासला (दै. संध्या)**



पानशेत-आंबी परिसरात हरीण, भेकर, ससे, मोर, लांडोर आदी वन्यप्राण्यांचा मुक्त संचार वाढला आहे. तीव उन्हामुळे जंगलात पाण्याचे तसेच खाद्याचे दुर्भीक्ष निर्माण झाले आहे. त्यामुळे शेजारच्या रानात, शेतात वन्यजीव खाद्य-पाण्यासाठी नियमितपणे संचार करताना दिसत आहेत. पानशेतजवळील आंबी (ता. हवेली) मध्ये सरकारी वनक्षेत्र नाही. मात्र, आसपासच्या परिसरात मोठ्या प्रमाणात वनक्षेत्र, जंगल, झुडपे आहेत. त्यामुळे आंबी येथील वरपेवाडी, कळकाईदरा, रुळे (ता. राजगड) येथील भोपळटोंग, सोनापूर आदी ठिकाणी वन्यप्राण्यांचा मुक्त संचार वाढल्याचे दिसून येत आहे. गेल्या चार-पाच वर्षांपासून उन्हाळ्यात आंबीमध्ये हरीण, काळवीट असे प्राणी खाद्य-पाण्यासाठी येत आहेत. गाई-वासरे अशा जनावरांबरोबर ते हिरवा चारा खाताना दिसत आहेत. तेथे पाणी पिऊन रात्रभर मुक्काम करून सकाळी लवकर पुन्हा जंगलात जात आहेत. सध्या आंबीमध्ये चितळ जातीच्या हरिणांची नर व मादी अशी जोडी फिरत आहे. स्थानिक शेतकरी गणेश विठ्ठल निवंगुणे यांच्या गाई गुरांसमवेत हरिणाची जोडी चारा खाऊन शेजारच्या बाबुंच्या बेटात मुक्काम करत आहेत. जनावरांनाही या हरिणांच्या जोडीचा लळा लागला आहे.खडकवासला-पानशेत परिसरात वन्यजीवांचा मुक्त संचार; हरिणांचे शेतात दर्शन वाढले आंबीच्या परिसरात मोठ्या जंगल वनराई आहे. त्यामुळे या ठिकाणी वन्यप्राण्यांचा अधिवास आहे. जंगलातील वन्यप्राणी चारा-पाण्यासाठी स्थलांतर करून शेजारच्या रानात येत आहेत. हरीण, भेकर, ससे आदी वन्यजीवांचा शेतकऱ्यांना उपद्रव होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी वन्यजीवांना उपद्रव करू नये.

# फुरसुंगीत उजवा मुठा कालवा ओव्हरफ्लो; भिंतींना तडे, फुटीचा धोका

**फुरसुंगी (दै. संध्या)**



कालवा सतत ओव्हरफ्लो होऊन वाहत असल्याने तो फुटण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने तत्काळ पावले उचलावीत. जलसंपदा विभागाने तातडीने पाहणी करून भिंतींची दुरुस्ती, भराव मजबुतीकरण अशा उपाययोजना कराव्यात.

**- बाळासाहेब (पिंटू) हरपळे, शेतकरी, फुरसुंगी**

फुरसुंगी परिसरातील उजवा मुठा कालवा सध्या काठोकाठ भरल्याने परिसरातील नागरिक आणि शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कालव्याच्या अनेक ठिकाणी भिंती कमकुवत झाल्या असून, काही भागांत भराव खचल्याचे दिसून येत आहे. तसेच, काही ठिकाणी कालव्याच्या भिंतीतून पाणी पाझरत असल्याने भविष्यात मोठा अपघात किंवा कालवा फुटण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कालवा पूर्णक्षमतेने भरलेला असल्याने ओव्हरफ्लोची परिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी, कालव्यालगत असलेल्या फुरसुंगी परिसरातील शेती पाण्याखाली जाण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. अनेक शेतकऱ्यांचे पीक आणि शेतीचे मोठे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, कालव्याच्या कडेला असलेली माती अनेक ठिकाणी खचली असून काही भागात संरक्षण भिंतींना तडे गेले आहेत. भिंतीतून सतत पाणी झिरपत असल्याने कालव्याची सुरक्षितता धोक्यात आली आहे. विशेषतः कालव्यालगत घरे असलेल्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, कोणतीही दुर्घटना घडल्यास मोठे नुकसान होऊ शकते, अशी चिंता व्यक्त होत आहे. या गंभीर परिस्थितीबाबत पुरंदर-हवेलीचे आमदार विजय शिवतारे यांनी देखील जलसंपदा विभागाशी पत्रव्यवहार करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. मात्र, अद्याप संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने याठिकाणी मोठ्या प्रमाणात आर्थिक हानी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# रिक्त पदे तातडीने भरा – उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

## योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवा

■ मुंबई (दै. संध्या)

शिक्षण, कौशल्य विकास, रोजगारनिर्मिती आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या माध्यमातून अल्पसंख्याक समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असून, अल्पसंख्याक विभागातील रिक्त पदे कालमर्यादित तातडीने भरण्याची प्रक्रिया गतीमान करावी. तसेच विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा अल्पसंख्याक विकास मंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले.

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने दिलेल्या आश्वासनांच्या पूर्ततेसंदर्भात सह्याद्री अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी आमदार अबू आझमी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले, तर आमदार सना मलिक-शेख, आमदार रईस शेख उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख आदि उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक उन्नतीसाठी राज्य शासन विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत आहे. या योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा, यासाठी प्रशासनाने अधिक सक्रिय आणि परिणामकारक पद्धतीने कार्य करणे आवश्यक आहे.



त्या पुढे म्हणाल्या की, अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे, विशेषतः मुलींसाठी उच्च व तांत्रिक शिक्षणाच्या सुविधा निर्माण करणे, ही काळाची गरज आहे. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन असून त्याद्वारे समाजाच्या प्रगतीला नवी दिशा मिळू शकते. बैठकीत 'मार्टी संस्थेशी संबंधित विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. संस्थेच्या कामकाजाला अधिक बळकटी देणे, प्रशिक्षण व शैक्षणिक उपक्रमांची व्याप्ती वाढविणे तसेच विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सुविधा अधिक सक्षम करण्याबाबत विविध मुद्द्यांचा आढावा घेण्यात आला. अल्पसंख्याक समाजातील युवकांना आधुनिक शिक्षण प्रणाली, कौशल्य विकास आणि तंत्रज्ञानाधारित शिक्षणाशी जोडण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. रोजगाराभिमुख प्रशिक्षण, उद्योजकता विकास आणि कौशल्यवृद्धी कार्यक्रमांच्या माध्यमातून युवकांना सक्षम करण्यावर शासनाचा विशेष भर राहणार असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी यावेळी स्पष्ट केले. याशिवाय, हज समितीमधील जागेबाबत आवश्यक कार्यवाही करण्यासाठी केंद्र शासनाशी पत्रव्यवहार करावा, तसेच प्रलंबित विषयांचा पाठपुरावा करून त्यांचा लवकरात लवकर निपटारा करावा, असे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी शासनाच्या सर्व विभागांनी समन्वयाने काम करून योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले.

## ५० किलोपेक्षा अधिक वजनाची हाताळणी करु नये : ॲड. आकाश फुंडकर

■ मुंबई (दै. संध्या)

आरोग्य आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने राज्यात माथाडी कामगारांकडून ५० किलोपेक्षा अधिक वजनाची हाताळणी करून घेण्यास प्रतिबंध करण्याबाबत लवकरच स्वतंत्र परिपत्रक जारी करण्यात येणार आहे. यासंदर्भातील नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी, असे निर्देश कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दिले. माथाडी कामगारांकडून ५० किलोपेक्षा जास्त वजनाच्या मालाची हाताळणी करून घेण्यास प्रतिबंध करण्याबाबत केंद्रीय श्रम मंत्रालयाने ३० ऑगस्ट १९९९ रोजी दिलेल्या निर्देशांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कामगार मंत्री ॲड. फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. मंत्री ॲड. फुंडकर म्हणाले



■ नियमांची प्रभावी अंमलबजावणी करणार

की, माथाडी कामगार आणि व्यापारी संघटनांमध्ये याबाबत कोणतेही मतभेद नाहीत. कामगारांचे आरोग्य आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने ५० किलोपेक्षा अधिक वजनाची हाताळणी टाळण्याबाबत व्यापक जनजागृती होणे आवश्यक आहे. राज्यात माथाडी कामगारांकडून ५० किलोपर्यंतच वजनाची हाताळणी करण्याबाबत परिपत्रक काढले जाणार असून त्याची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल. तसेच इतर राज्यांमध्येही या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी केंद्र सरकारशी समन्वय साधला जाईल.

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या १५ एप्रिल २०२६ परिपत्रकानुसार नाशिक जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ (लासलगाव) यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्या, उपबाजार समित्या, व्यापारी संघटना, ट्रान्सपोर्ट व्यवसाय, बियाणे महामंडळ, वखार महामंडळ तसेच इतर संबंधित आस्थापनांना कोणत्याही उद्योग अथवा व्यवसायात ५० किलोपेक्षा अधिक वजनाची चढ-उतार किंवा हाताळणी कामगारांकडून करून घेऊ नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच कामगार विभागाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या निर्देशांचे काटेकोर पालन करण्याबाबतही कळविण्यात आले

## सर्पदंशावरील संशोधनासाठी भारत-घाना सहकार्याची नवी दिशा

■ मुंबई (दै. संध्या)

सर्पदंशावरील प्रभावी उपचारपद्धती विकसित करण्यासह जागतिक आरोग्य संशोधनाला चालना देण्यासाठी मुंबईतील हाफकिन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था (एचआयटीआरआय) आणि घाना सरकारच्या सेंटर फॉर प्लांट मेडिसिन रिसर्च (सीपीएमआर) यांच्यात धोरणात्मक सहकार्याची दिशा निश्चित करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली. परळ येथील हाफकिन संस्थेच्या मुख्यालयात झालेल्या या बैठकीत दोन्ही संस्थांनी वैज्ञानिक संशोधन, पारंपरिक औषधांचे वैज्ञानिक प्रमाणीकरण आणि सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील सहकार्याच्या विविध संधींचा आढावा घेण्यात आला. हाफकिन संस्थेचे संचालक डॉ. सुवर्णा खरात तसेच संस्थेतील अजित जगताप, मृणाल घाग सावंत यांच्या समवेत झालेल्या बैठकीत घानाच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाने सहभाग घेतला. या शिष्टमंडळात सीपीएमआरचे अध्यक्ष हेन्री रॉकफेलर निम्बाबोउरा, कार्यकारी संचालक प्रा. ॲलेक्स असासे, उपकार्यकारी संचालक डॉ. जोनास कोफी डॉनकोर, फॉर्माकॉलॉजी व टॉक्सिकॉलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. स्टीफन अँटवी तसेच नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हॅक्सिनचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. फैसल नहू आणि तांत्रिक सल्लागार डेव्हिड बोआमा अचेम्पॉग यांचा समावेश होता.



## कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्याचे परिवहन मंत्री सरनाईक यांचे निर्देश

■ मुंबई (दै. संध्या)

मोटार वाहन विभाग कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांवर कायद्याच्या चौकटीत राहून मार्ग काढण्यात यावा, तसेच प्रलंबित विषयांवर टप्प्याटप्प्याने कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी अधिकाऱ्यांना दिले. मोटार वाहन विभागातील कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत परिवहन मंत्री सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक पार पडली. बैठकीत मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेच्या प्रतिनिधींनी विभागाच्या आकृतीबंधाची तातडीने अंमलबजावणी, विविध संवर्गांसाठी सेवा प्रवेश नियम निश्चित करणे, पदोन्नती प्रक्रियेला गती देणे तसेच आश्वासित प्रगती योजनेचे लाभ देण्याबाबतच्या मागण्या मांडल्या. या सर्व विषयांवर शासन स्तरावर आवश्यक पाठपुरावा करून निर्णय प्रक्रियेला गती देण्याचे निर्देश मंत्री सरनाईक यांनी दिले. संघटनेने सर्व संवर्गांसाठी सेवा प्रवेश नियम तयार करण्याची मागणी केली. विशेषतः वर्ग-२ प्रशासकीय अधिकारी, कार्यालयीन अधीक्षक, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक तसेच वर्ग-३ संवर्गातील पदांसाठी सेवा प्रवेश नियम निश्चित करण्याची मागणी करण्यात आली. विभागाचे कामकाज अधिक प्रभावी आणि

■ आकृतीबंध, सेवा प्रवेश नियम, पदोन्नती आणि आश्वासित प्रगती योजनेसह विविध मागण्यांवर चर्चा

सुरळीत होण्यासाठी ही प्रक्रिया प्राधान्याने पूर्ण करण्यात येणार असल्याचे मंत्री श्री.सरनाईक यांनी सांगितले. तसेच वरिष्ठ लिपिक आणि कार्यालयीन अधीक्षक पदावरील पात्र कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचे लाभ मिळण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचनाही मंत्री सरनाईक यांनी दिल्या. याशिवाय, प्रतिनियुक्ती रद्द झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कायमस्वरूपी बदलीचा प्रश्न, प्रशासन विभागातील काही कर्मचाऱ्यांना बदली कायदा २००५ लागू करण्याची मागणी; तसेच अन्य प्रलंबित प्रशासकीय विषयांवरही संघटनेने सविस्तर मांडणी केली. त्यावर सकारात्मक भूमिका घेऊन आवश्यक कार्यवाही करण्यात येणार असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, अप्पर आयुक्त भरत कळसकर, सह आयुक्त संजय मैत्रेवार, सह आयुक्त रवींद्र गायकवाड आदी उपस्थित होते. मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेच्या वतीने अध्यक्ष प्रकाश पाटील तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

## दर्जाबाबत तक्रार नोंदणीसाठी टोल-फ्री क्रमांक जाहीर

### प्रतिबंधित पान मसाला, गुटखा, भेसळयुक्त अन्नपदार्थांचा १ कोटी ५८ लाख २८ हजार रुपयांचा साठा जप्त

■ अन्न व औषध प्रशासनाच्या राज्यव्यापी मोहीम

■ सात दिवसात १०२ व्यक्ती अटकेत

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील प्रतिबंधित पान मसाला,गुटखा, भेसळ अन्नपदार्थाविरोधात अन्न व औषध प्रशासनाने राज्यभर सात दिवस धडक मोहीम राबवत २५ मे ते ३१ मे २०२६ या कालावधीत एकूण १ कोटी ५८ लाख २८ हजार ६७७ रुपयांचा साठा जप्त केला असून १०२ व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. एकूण २०३ आस्थापनांवर कारवाई केली. तसेच ८६ आस्थापना सील करण्यात आल्या आहेत.

आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार राज्यभर प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि तत्सम पदार्थांच्या उत्पादन, साठवणूक व विक्रीविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. या कारवाईत १३० आस्थापनांवर छापे टाकण्यात आले. यामध्ये भारतीय न्याय संहितेच्या कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच अन्न सुरक्षा व मानके कायद्याच्या कलम २६, २७, ३०(२)(अ) आणि ५९ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईत ३४ लाख ५ हजार ४८ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अन्न व औषध प्रशासनाच्या 'सेफ फूड, सेफ ड्रग, सेफ महाराष्ट्र' या संकल्पनेअंतर्गत राज्यभर भेसळ, अस्वच्छ अन्न उत्पादक आणि नियमभंग करणाऱ्या अन्न व्यवसायिकांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. मुंबई, नवी मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, नाशिक, भंडारा, जालना, बीड, नांदेड, परभणी, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, वर्धा, यवतमाळ, अमरावती,



- कोकण विभाग – ४७ कारवाया, ४६ व्यक्तींना अटक
- बृहन्मुंबई – २२ कारवाया, २३ व्यक्तींना अटक
- पुणे विभाग – १४ कारवाया, १३ व्यक्तींना अटक
- नाशिक विभाग – ५ कारवाया, ५ व्यक्तींना अटक
- छत्रपती संभाजीनगर विभाग – ८ कारवाया, ८ व्यक्तींना अटक
- अमरावती विभाग – ५ कारवाया, ५ व्यक्तींना अटक
- नागपूर विभाग – २ कारवाया, २ व्यक्तींना अटक

अकोला, वाशीम, जळगाव, रायगड, धुळे आदी जिल्ह्यांमध्ये अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर तपासण्या केल्या.

या मोहिमेत ७३ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये आंबे, बुंदी लाडू, खवा, बेकरी पदार्थ, कँडी, दूध व दुग्धजन्य पदार्थ, गूळ, खाद्यतेल, तूप, खजूर, आईस्क्रीम, कुल्फी, फ्रोजन डेझर्ट, मसाले, शेंगदाणा चिक्की तसेच भेसळीसाठी वापरल्या जाणाऱ्या पदार्थांचा समावेश होता. या कारवाईत १ कोटी २४ लाख २३ हजार ६२९ रुपये किमतीचा आणि सुमारे १०,६३९ किलो वजनाचा संशयित निकृष्ट व असुरक्षित अन्नसाठा जप्त करण्यात आला. संबंधित अन्न नमुने पुढील विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. नागरिकांना शुद्ध आणि सुरक्षित अन्न मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. भेसळ, निकृष्ट दर्जाचे अन्न किंवा प्रतिबंधित पदार्थांचे उत्पादन व विक्री आढळल्यास यापुढे आणखी कठोर कारवाई करण्यात येईल," असा स्पष्ट इशारा अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला आहे. अन्नपदार्थांच्या दर्जाबाबत शंका असल्यास नागरिकांनी अन्न व औषध प्रशासनाशी संपर्क साधावा. यासाठी स्वतंत्र तक्रार नोंदणी ॲप विकसित करण्यात आले आहे.

– टोल फ्री क्रमांक : १८००२२२३६५

– ई-मेल : jc-foodhq@gov.in

तक्रार करताना नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, संबंधित आस्थापनेचा अचूक पत्ता आणि कोणत्या अन्नपदार्थात भेसळ होत असल्याची माहिती नमूद करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# हातभट्टी विरोधी मोहिमेला वेग, दीड कोटीचा मुद्देमाल जप्त

■ मुंबई (दै. संध्या)

मागील आठवड्यात पुणे शहरामध्ये घडलेल्या विषारी दारु दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर विविध अवैध हातभट्टी निर्मिती व विक्री केंद्राविरुध्द कारवाई करण्यासाठी उत्पादन शुल्ककडून विशेष पथक स्थापन करून मोहीम राबविण्यात आली. मोहिमेदरम्यान २९ मे ते २ जून २०२६ या कालावधीमध्ये कोकण विभागातील ठाणे, पालघर व रायगड या तीनही जिल्ह्यात एकूण ३१३ गुन्हे नोंद करुन २१३ आरोपींना अटक करण्यात आली. या कारवायांमध्ये एक कोटी ५८ लाख १७ हजार ५४६ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



स्पेशल अँकर — सत्य • स्पष्ट • सर्वप्रथम

ठाणे जिल्ह्यातील हातभट्टी निर्मितीचे हॉटस्पॉट असलेले दिवा गावखाडी भाग, घेसर, अंजूर, अलीमघर, छोटी देसाई, मोठी देसाई, आगासन, खर्डी, सरळांबे, वाशाळा, घोरपे, पालेगांव, सावरणे, वेळू, कोरावले, वसारगाव, हाजीमलंग, कुशिवली, माणेरागाव, द्वारलीपाडा, कुंभार्ली, केवणी, कालवार, वडुनवघर, मामेखर्डी, कारीवली, मामणोली, जांभुळगाव, नांदपगाव, उत्तन, मुरदागाव, कोपराखाडी, गोराई खाडी याठिकाणी गुन्हे नोंद करुन सदर हातभट्टी निर्मिती केंद्र नष्ट करण्याची कारवाई केली. तसेच पालघर जिल्ह्यातील मालजीपाडा, वसई, विरार व पालघर याठिकाणी गुन्हे नोंद करुन सदर हातभट्टी निर्मिती केंद्र नष्ट करण्याची कारवाई करण्यात आली. तसेच रायगड जिल्ह्यातील रावेगाव, बेकरेगाव, जावळीगाव याठिकाणी गुन्हे नोंद करुन हातभट्टी नष्ट करण्यात आल्या आहेत. तसेच अवैध मद्य वाहतूकी विरुध्द गुन्हे नोंद करुन एकूण आठ वाहने जप्त करण्यात आली आहेत. पुणे येथे झालेल्या घटनेच्या अनुषंगाने अनुचित प्रकार घडू नये, त्याकरिता ठाणे विभागातील दारुचे साठे व निर्मिती केंद्र, विक्री करणारे त्यांच्याविरुद्ध राज्य उत्पादन शुल्क विभाग कारवाई करीत आहे. राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे यांनी दिलेल्या निर्देशानुसार विभागीय उपआयुक्त प्रदीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली अधीक्षक उत्तम शिंदे, उपअधीक्षक अभिजीत देशमुख, निरीक्षक संजय ढेरे, दिपक परब, दुय्यम निरीक्षक अंकुश अवताडे व जवान यांनी कारवाईमध्ये सहभाग घेतला. आपल्या परिसरात कोठेही बनावट मद्य, परराज्यातील मद्य, अवैध मद्य निर्मिती किंवा विक्री होत असेल अथवा मिथेनॉल, क्लोरेल हायड्रेट यासारख्या पदार्थाची किंवा द्रव्याची निर्मिती, भेसळ, वाहतूक किंवा विक्री होत असल्यास 18002339999 या टोल-फ्री क्रमांकावर माहिती द्यावी. तसेच 8422001133 या व्हॉट्सॲप क्रमांकावरही माहिती पाठवता येईल. माहिती देणाऱ्यांचे नाव गोपनीय ठेवले जाईल, असे आवाहनही राज्य उत्पादन शुल्क कोकण विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### नाटकाची तिकिटे तिकीटालय वर उपलब्ध



मुंबई (दैनिक संध्या) : सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 36 व्या महाराष्ट्र राज्य मराठी व्यावसायिक नाट्य स्पर्धेची अंतिम फेरी 8 जून ते 18 जून 2026 या कालावधीत येथील छत्रपती शिवाजी नाट्य मंदिरात पार पडणार आहे. या स्पर्धेच्या इतिहासात प्रथमच यावर्षी ऑनलाईन पद्धतीने 'तिकीटालय' ॲपवरुन या स्पर्धेतील नाटकाची तिकिटे उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी सांगितले. राज्यातील दर्जेदार व्यावसायिक नाट्यप्रयोगांचे सादरीकरण या अंतिम फेरीत होणार असून रसिक प्रेक्षकांना उत्कृष्ट नाट्यकृतींचा आस्वाद घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. स्पर्धेच्या अंतिम फेरीत विविध नामांकित नाट्यसंस्थांचे आणि निर्मात्यांचे नाट्यप्रयोग होणार आहेत. 8 जून रोजी 'ठरलंय FOREVER' या नाटकाने स्पर्धेची सुरुवात होणार होईल. त्यानंतर 'सविता दामोदर परांजपे', 'भूमिका', 'चिरंजीव परफेक्ट बिघडलाय!', 'कुटुंब किरैतन', 'एकदा असंच पाहावं करून', 'करुणाष्टके-उंबरठ्या पलीकडची गोष्ट', 'मीमी' आणि 'शंकर जयकिशन' हे नाट्यप्रयोग सादर करण्यात येतील. या सर्व नाट्यकृतींमधून सामाजिक, कौटुंबिक, विनोदी; तसेच समकालीन विषयांचे विविध पैलू रंगभूमीवर उलगडले जाणार आहेत.

### जन्मशताब्दीनिमित्त ७ जून रोजी विशेष संगीत रजनी



मुंबई (दैनिक संध्या) : सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे हिंदी चित्रपटसृष्टीतील अजरामर संगीतकार ओ. पी. नय्यर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'तुमसा नहीं देखा' या विशेष संगीत रजनी कार्यक्रमाचे 7 जून 2026 रोजी आयोजन करण्यात आले आहे. येथील दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात हा कार्यक्रम रविवार 7 जून रोजी रात्री 8.30 वाजता होणार आहे. कार्यक्रमाच्या विनामूल्य प्रवेशिका 6 जून 2026 पासून नाट्यगृहावर उपलब्ध होतील. भारतीय चित्रपटसृष्टीतील संगीताच्या सुवर्णयुगाला आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आणि लयबद्ध संगीतशैलीने समृद्ध करणारे संगीतकार ओ. पी. नय्यर यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. त्यांच्या संगीताने हिंदी चित्रपटसंगीताला एक वेगळी ओळख प्राप्त करून दिली. 'उडे जब जब जुल्फें तेरी', 'आईये मेहरबान', 'ये है बॉम्बे मेरी जान', 'दीवाना हुआ बादल', 'जाइये आप कहाँ जायेंगे' यासारखी अनेक अजरामर गीते आजही रसिकांच्या मनात लोकप्रिय आहेत. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या विशेष संगीत रजनीत त्यांच्या निवडक आणि गाजलेल्या गीतांचा सुरेल आविष्कार सादर करण्यात येणार आहे.

### मागण्यांबाबत अहवाल सादर करा : फुंडकर

मुंबई (दैनिक संध्या) : रोथे एर्डे इंडिया प्रा. लि., वाडीवऱ्हे (ता. इगतपुरी, जि. नाशिक) येथील कामगारांच्या विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी प्राधान्य देऊन तसा अहवाल सादर करावा, असे निर्देश कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दिले. त्यांच्या अध्यक्षतेखाली नरिमन भवन येथे बैठक पार पडली. कामगार मंत्री ॲड. फुंडकर म्हणाले, कामगार कायदे, किमान वेतन, कामाचे तास तसेच इतर नियमांचे कंपनीतर्फे पालन होत आहे किंवा नाही, याची चौकशी करून वस्तुनिष्ठ अहवाल प्राधान्याने सादर करावा. अहवाल प्राप्त झाल्यानंतर वस्तुस्थितीच्या आधारे कामगारांना न्याय देण्याबाबत आवश्यक कार्यवाही केली जाईल. बैठकीत कामगार प्रतिनिधींनी काही कंत्राटी कामगारांच्या बदलीबाबत तसेच वेतन आणि इतर सेवाशर्तींसंदर्भातील मुद्दे उपस्थित केले. यावर चर्चा करताना मंत्री ॲड. फुंडकर यांनी कामगार आणि कंपनी व्यवस्थापन या दोन्ही पक्षांशी स्वतंत्रपणे तसेच संयुक्तरित्या चर्चा करून सामंजस्याने उपाय योजना करण्याविषयी सूचना दिल्या. कामगारांच्या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून, त्यांच्या मागण्या कायदेशीर व वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून पूर्ण कराव्यात. सर्व संबंधित पक्षांना न्याय मिळेल, यासाठी कामगार विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी, असेही मंत्री ॲड. फुंडकर यांनी नमूद केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### आरोपीने दिली गुन्ह्याची न्यायबाह्य कबुली

पुणे (दैनिक संध्या) : नसरापूर येथे चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिचा खून केल्याप्रकरणी अटक आरोपीविरोधात बुधवारी सहा साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. गुन्हा करून पसार झालेल्या आरोपीला दोन ग्रामस्थांनी शोधले. त्या वेळी आरोपीने गुन्ह्याची न्यायबाह्य कबुली दिल्याचे साक्ष एका साक्षीदाराने दिली. या प्रकरणात आरोपी भीमराव प्रभाकर कांबळे (वय ६५, रा. भोर) याच्याविरोधात राजगड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्या न्यायालयात या खटल्याची सुनावणी सुरू आहे. त्यामध्ये आतापर्यंत एकूण २३ साक्षीदारांची साक्ष विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी नोंदविली; तर बचाव पक्षातर्फे ॲड. हिंमतराव सुर्यवंशी यांनी उलटतपासणी घेतली. तक्रारदार मुलीच्या कुटुंबातर्फे ॲड. मनीष पाडेकर व ॲड. मयूर दोडके यांनी काम पाहिले. आरोपीने मुलीला गाठीशेवेचे आमिष दाखविले होते. ही गाठीशेव विकत घेतली त्या मिठाई विक्रेत्याचीही साक्ष व उलटतपासणी न्यायालयासमोर नोंदविण्यात आली. गुन्हा केल्यानंतर आरोपी पळून गेला होता. सीसीटीव्ही चित्रीकरणात आरोपी मुलीला घेऊन जाताना दिसल्याने दोन ग्रामस्थांनी दुचाकीवरून त्याचा शोध घेतला. शोध घेत असताना त्यांना आरोपी एका मंदिराजवळ सापडला. त्याला जाब विचारला असता, आरोपीने चूक झाल्याचे सांगत मुलीला मारल्याची न्यायबाह्य कबुली एका ग्रामस्थाकडे दिली होती. या ग्रामस्थाची साक्ष व उलटतपासणीची प्रक्रियाही पूर्ण करण्यात आली.

### अंदाधुंद गोळीबार प्रकरणानंतर अलर्ट झालेल्या पोलिस दलाने धरपकड केली सुरु

शिरूर (दैनिक संध्या) : तालुक्यातील करडे घाटात झालेल्या अंदाधुंद गोळीबार प्रकरणानंतर अलर्ट झालेल्या पोलिस दलाने शहर व परिसरातील अनेक नामचीन गुंडांची धरपकड सुरू केली असून, काल रात्रीपासून अनेकांना ताब्यात घेण्यात आले आहे. दरम्यान, करडे घाट गोळीबार व खूनप्रकरणी पहाटे सहाजणांना अटक करण्यात आली असली; तरी या हल्ला प्रकरणातील मुख्य सूत्रधार मात्र अद्याप पोलिसांच्या हाती लागू शकला नाही. सोमवारी (ता. १) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास करडे घाटात मोटारीला ठोकर देत सहाजणांच्या टोळक्याने अंदाधुंद गोळीबार केला होता. या गोळीबारात विशाल सुनील काळे (वय ३१, रा. ढोरआळी, मुंबई बाजार, शिरूर) याचा मृत्यु झाला होता. या खूनप्रकरणी सनी संजय यादव व विशाल जगन्नाथ पंदी (रा. बकोरी फाटा, वाघोली, पुणे) यांच्यासह सहाजणांविरूद्ध गुन्हा दाखल झाला होता. या गोळीबार व जीवघेण्या हल्ल्याच्या प्रकाराची गंभीर दखल घेत विशेष पोलिस महानिरीक्षक रंजनकुमार शर्मा, जिल्हा पोलिस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी घटनास्थळी भेट देत हल्लेखोरांच्या तपासाबाबत कडक सूचना दिल्या होत्या, तर अप्पर पोलिस अधीक्षक शिवकुमार व शिरूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत ढोले हे गेले दोन दिवस शिरूर पोलिस ठाण्यातच तळ ठोकून बसले होते. पोलिस निरीक्षक संदेश केंजळे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, पोलिस उपनिरीक्षक दिलीप पवार, शुभम चव्हाण, गोविंद खटींग यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत हल्लेखोरांची धरपकड सुरू केली. त्यासाठी संशयितांच्या संपर्कात असलेल्या, त्यांच्या टोळीत कार्यरत असलेल्या किंवा त्यांच्याशी आर्थिक, व्यावसायिक संबंध असलेल्या रेकॉर्डवरील गुंडांची आणि भाई, दादांची कसून चौकशी सुरू केली होती. काल रात्रीपासून पन्नासहून अधिक गुंड प्रवृत्तीच्या तरूणांना ताब्यात घेऊन त्यांची कसून चौकशी करण्यात आली होती. याच चौकशीतून पोलिसांच्या हाती महत्वाचे धागेदोरे लागले होते. त्याआधारे अमन उर्फ मुन्ना दस्तगीर पटेल (वय-२६), इरफान उर्फ विशाल जगन्नाथ पंदी (वय-२४), आदित्य दीपक कांबळे (वय-१९, सर्व रा. वाघोली, पुणे), पाड्या उर्फ पांडा बालाजी कांबळे (वय-२६, रा. तुकाई मळा, रामलिंग, शिरूर), सिद्धेश उर्फ बाळ्या तुकाराम शिंदे (वय-२१, रा. बाबूराव नगर, शिरूर) व देवानंद शिवाजी चव्हाण (वय-२७, रा. मारूती आळी, शिरूर) यांना आज पहाटे अटक करण्यात आली. शिरूर न्यायालयाने त्यांना मंगळवार (ता. ९) पर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

### विषारी दारूसाठी रसायन पुरविणाऱ्या पिता-पुत्राला नवी मुंबईतून अटक

पुणे (दैनिक संध्या) : दापोडी आणि हडपसर परिसरात विषारी हातभट्टी दारूमुळे झालेल्या मृत्यूप्रकरणी राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने (सीआयडी) मोठी कारवाई केली. हातभट्टीच्या दारूमध्ये विषारी रासायनिक पदार्थ पुरवणाऱ्या मुख्य दोन आरोपींना सीआयडीच्या पुणे पथकाने नवी मुंबईतील वाशी गावातून बेड्या ठोकल्या आहेत. अरुण जगदंब चौबे (वय ५९) आणि अभिषेक अरुण चौबे (वय ३४, दोन्ही रा. वाशीगाव, नवी मुंबई) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. आरोपी पिता-पुत्राला पिंपरी येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयासमोर हजर केले असता, न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. पिंपरी-चिंचवडमधील दापोडी आणि पुण्यातील हडपसर परिसरात विषारी हातभट्टीची दारू पिल्याने विषबाधा झाली होती. त्यात २० हून अधिक जणांचा मृत्यू झाला होता. या गुन्ह्याचा तपास सीआडीकडे आल्यानंतर दहा पथके तयार करण्यात आली आहेत. या पथकांनी विविध ठिकाणी भेटी दिल्या. तेथील सीसीटीव्ही फुटेज, दारूचे नमुने आणि इतर तांत्रिक पुरावे जप्त करण्यात आले. हे सर्व नमुने विश्लेषणासाठी पुण्यातील न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. या तांत्रिक तपासाच्या आणि पुराव्यांच्या आधारे, हातभट्टी चालकांना विषारी रासायनिक पदार्थ पुरवण्याचे काम हे नवी मुंबईतील चौबे पिता-पुत्र करत असल्याचे समोर आले.

# सासवडच्या पालखी तळाची पाहणी

**सासवड (दै. संध्या)**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज आषाढी वारी पालखी सोहळ्याचे ११ जुलै रोजी दोन दिवसांच्या मुक्कामासाठी सासवड (ता. पुरंदर) नगरीत आगमन होत आहे. या पार्श्वभूमीवर, पुण्याच्या विभागीय आयुक्त शीतल तेली उगले यांनी गुरुवारी (ता.४) सासवड येथील पालखी तळाची आणि पालखी पाहणी केली.

प्रशासनाच्या वतीने सासवडच्या नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, उपविभागीय अधिकारी वर्षा लांडगे, तहसीलदार विक्रम राजपूत, मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, बारामतीचे अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिंह गौर, पोलीस निरीक्षक कुमार कदम, जिल्हा परिषद सदस्य हरीभाऊ लोळे, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, नगरसेवक राजन जगताप, ज्ञानेश्वर गिरमे, प्रदीप राऊत,



■ सासवड (ता. पुरंदर) : विभागीय आयुक्त शितल तेली यांना निवेदन देताना नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप. ■

ज्ञानेश्वर जगताप, स्मिता जगताप, लिना वढणे यांसह शासनाच्या विविध विभागांचे अधिकारी, नगरसेवक उपस्थित होते.

याप्रसंगी नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप आणि मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण यांनी सासवडच्या वीर धरण पाणी योजनेच्या सातारा व पुणे जिल्ह्यातील भारनियमनाच्या वेळा वेगवेगळ्या असल्याने पाणी उपसा करण्यासाठी अडचणी येत असून पाणीपुरवठ्यासाठी सुरळीत विजपुरवठा व्हावा., तसेच कचरा व्यवस्थापनासाठी १५ नवीन घंटागाड्यांची उपलब्धता व्हावी याबाबत विभागीय आयुक्त शीतल तेली यांना निवेदन दिले. याबरोबरच संत सोपानदेव देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त श्रीकांत गोसावी आणि चोपदार सिद्धेश शिंदे यांनी सासवडमधील संत सोपानकाका पालखी मार्गाची दुरूस्ती करण्याची मागणी केली. याबरोबरच चांगावटेश्वर पालखी सोहळ्याचे विश्वस्त शशिकांत जगताप यांनी पालखी मार्गावरील खडकी ते शेटफळगढे आणि डाळज नं. १ ते डाळज नं. ३ च्या रस्त्याच्या दुरूस्तीची मागणी केली. यावर विभागीय आयुक्त शीतल तेली यांनी तिर्थक्षेत्र विकास मधून प्रस्ताव करण्याच्या सुचना दिल्या.

## गर्भलिंग निदान रॅकेटची व्याप्ती मोठी; दोघेजण अद्याप फरार

### आणखी काहींचा सहभाग असण्याची शक्यता

**पुणे/केडगाव (दै. संध्या)**



दौंड तालुक्यातील केडगाव परिसरात बेकायदेशीर गर्भलिंग निदान प्रकरणात अटकेत असलेल्या आरोपी अण्णासाहेब गिरी आणि त्याचा साथीदार डॉ. अतुल जाधव (रा. वाघोली) या दोघांची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली आहे. वाघोलीतील गर्भलिंग निदान प्रकरणातील अन्य एक आरोपी न्यायालयीन कोठडीत असून, त्यालाही चौकशीसाठी ताब्यात घेण्यात येणार आहे. तर अन्य दोघेजण अद्याप फरार आहेत. या संदर्भात पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी बुधवारी (ता. ३) पत्रकार परिषदेत माहिती दिली. त्यानुसार, वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन गुजर यांना १४ मे रोजी यांना व्हिडिओ प्राप्त झाला होता. त्यात अण्णासाहेब गिरी (रा. केडगाव, ता. दौंड; मूळ रा. हंगा, ता. पारनेर) हा महिलेची बेकायदेशीर गर्भलिंग चाचणी करताना दिसत होता. या प्रकरणी 'गर्भधारणा पूर्व व प्रसव पूर्व रोग निदान तंत्रे' कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्यात आणखी काहीजणांचा सहभाग असून, व्याप्ती मोठी असल्याने गुन्ह्यात गंभीर कलमांची वाढ केली आहे. चौकशीदरम्यान लोहगाव-वाघोली येथील डॉ. अतुल अंकुश जाधव आणि केसनंद येथील नरेंद्र साहेबराव ठाकरे यांचा सहभाग उघड झाला. त्यापैकी अतुल जाधव याला २४ मे रोजी अटक करण्यात आली. तर दुसरा आरोपी नरेंद्र ठाकरे हा वाघोली पोलिस ठाण्यातील अशाच एका गुन्ह्यात न्यायालयीन कोठडीत आहे.

## लग्न लावून देत नसल्याने वडिलांसह भावाचा खून

**ओतूर (दै. संध्या)**

लग्न लावून देत नसल्याच्या कारणावरून मुलाने झोपेत असलेल्या वडिलांची आणि सख्या भावाची लाकडी चोपणी व दगडाने ठेचून हत्या केली. जुन्नर तालुक्यातील पारगावतर्फे मढ येथील बगाडवाडीत बुधवारी (ता. ३) सकाळी उघडकीस आलेल्या या दुहेरी हत्याकांडामुळे संपूर्ण तालुका हादरला असून, पोलिसांनी आरोपीवर गुन्हा दाखल केला असून, अटक करण्याची प्रक्रिया सुरू आहे. बाबजी जयराम मुकणे (वय ३२) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे, तर जयराम महादू मुकणे (वय ६०) आणि राजू जयराम मुकणे (वय २७) अशी खून झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी तिसरा मुलगा युवराज मुकणे याने फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बगाडवाडी येथील एका शेतातील



पत्राशेडमध्ये मुकणे कुटुंब वास्तव्यास आहे. आरोपी बाबजी याचे लग्न लावून दिले जात नसल्याने तो कुटुंबावर नाराज होता. याच रागातून त्याने बुधवारी पहाटे वडील जयराम आणि भाऊ राजू यांच्यावर लाकडी चोपणीने हल्ला केला व डोक्यात दगड घालून त्यांची हत्या केली. पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक संदीपसिंग गिल यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## विभागीय आयुक्तांनी जेजुरीच्या पालखी तळाचा घेतला आढावा

### पाणी, स्वच्छता, आरोग्य, अतिक्रमणे आदी विषयी केल्या सूचना

**जेजुरी (दै. संध्या)**

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा दिनांक 13 जुलै रोजी मुक्कामी विसवणार असून त्या अनुषंगाने पालखी सोहळ्यातील वारकरी बांधवांना सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या हेतुन विभागीय आयुक्त शीतल तेली उगले यांनी जेजुरी येथील पालखी तळाची पाहणी करून सुविधांबाबत आढावा घेतला. महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्या वेळी शिव आणि वैष्णव भक्तांचा मिलाफ होत असतो. लाखो वारकरी भाविक येथे मुक्कामी विसावत असतात. जेजुरी गडाच्या पायथ्याशी व ऐतिहासिक होळकर तलावाकाठी जेजुरी



■ विभागीय आयुक्त शीतल तेली उगले यांनी जेजुरी येथील संत ज्ञानेश्वर महाराज पालखी तळाची पाहणी करून सुविधांबाबत चर्चा केली. ■

नगरपरिषदेच्या वतीने सुमारे नऊ एकर जागेत संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासाठी पालखी तळ विकसित केले आहे. दिनांक 13 जुलै रोजी संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा मल्हारी नगरीत मुक्कामी असून वारकरी भाविकांना सुविधा उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने पुणे जिल्ह्याच्या विभागीय आयुक्त शीतल तेली उगले यांनी जेजुरीच्या पालखी तळाला भेट देऊन येथील सुविधांचा आढावा घेतला. पालखी तळावर पाणी स्वच्छता, अतिक्रमण, आरोग्य, वीज, मैदानाचे सपाटीकरण, पार्किंग, आदी सुविधा बाबत त्यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. यावेळी प्रांत अधिकारी वर्षा लांडगे, तहसीलदार विक्रम राजपूत, भोर विभागीय पोलिस अधिकारी राजेंद्रसिंह गौर,अभिजीत आवटे, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विक्रम काळे, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रकाश निगडे, मंडल अधिकारी संजय बडदे व पोलिस, नगरपरिषद, आरोग्य, वीज, आदी विभागाचे अधिकारी, नगरसेवक कृष्णा कुदळे,अविनाश डोंबे,शिवाजी जगताप,स्वप्नील हरपळे आदी उपस्थित होते.

जेजुरी नगरपरिषदेच्या वतीने पाणी, स्वच्छता, पालखी तळावरील मार्ग,पार्किंग, आरोग्य, वीज, सपाटीकरण आदी सुविधा बाबत मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले यांनी यावेळी माहिती दिली.

## वाडा गावच्या जुन्या आठवणींना उजाळा; जुन्या वाडा गावचे अवशेष पुन्हा उघड्यावर

**चास (दै. संध्या)**

चासकमान धरणातील पाणीसाठा संपुष्टात येवू लागल्याने खेड तालुक्यातील जुन्या वाडा गावचे अवशेष पुन्हा उघड्यावर आले आहेत. पाण्याखाली गेलेली मंदिरे आणि घरांचे अवशेष दिसू लागल्याने विस्थापित ग्रामस्थांच्या आठवणींना उजाळा मिळाला असून, पर्यटकांचीही गर्दी होत आहे. चासकमान धरण झाले मात्र या धरणामुळे विस्थापित झालेल्या



वाडा गावातील नागरिकांच्या भावना आपले घर, अंगण, शेती, मंदिरे व गावची बाजारपेठ यामध्ये हजारो मने जुन्या गावातच गुंतलेली आहेत. विस्थापित झालेल्या नागरिकांची आजही ससेहोलपट झालेली आपण पहात आहोत. मात्र, धरणातील पाणीसाठा कमी होताच उघडे पडलेले आपले वाडा गाव पाहताना अनेकांची मने आजही हेलावतात.

सुमारे ५१ गावे व वाडीवस्त्या यांची मुख्य भिस्त व व्यापारी गाव असलेले वाडा हे गाव भीमा नदीच्या तीरावर वसलेले होते. गावात सर्व जातीधर्मांचे लोक गुण्यागोविंदाने व एकोप्याने रहात होते. मोठी बाजारपेठ, जुन्या काळातील मोठे वाडे, गावात भरणारी धर्मरायाची यात्रा यामुळे गावात प्रचंड उलाढाल होत असे.

### पाण्याखाली ३४ वर्षे राहूनही सुस्थितीत

१९९२ नंतर सुमारे ३४ वर्षे पाण्याखाली राहूनही ही मंदिरे अजूनही सुस्थितीत आहेत. चालू वर्षीही ही मंदिरे पाण्यातून वर येण्यास सुरुवात झाली असल्याने पर्यटकांबरोबरच विस्थापित झालेल्या नागरिकांसाठी पर्वणी ठरते आहे.

चासकमान धरणाच्या जलाशयात अनेक गावे लुप्त झाली व लुप्त झालेल्या गावांमध्ये मुख्य गाव होते ते वाडा गाव. नागरिक विस्थापित झाले, आपली घरे मोडून आपला संसार मोडून कोणी भीमा-कोरेगांव, कोणी शिरूर तर कोणी दोन किलोमीटर अंतरावर वसवलेल्या नवीन वाडा गावांत स्थायिक झाले.

# छपाईला उशीर, वितरणावर प्रश्नचिन्ह

### शाळा सुरू, पुस्तकांचा पत्ता नाही! नव्या अभ्यासक्रमाच्या पाठ्यपुस्तकांबाबत धक्कादायक वास्तव समोर

**पुणे (दै. संध्या)**

शाळा सुरू होण्यास अवघे काही दिवस शिल्लक असताना नव्या अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तकेच तयार नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. प्रशासनाच्या कामकाजातील दिरंगाईमुळे इयत्ता सहावीच्या पाठ्यपुस्तकांच्या छपाईला विलंब झाला आहे. दरम्यान, इयत्ता सहावीच्या मराठी, इंग्रजी आणि उर्दू माध्यमांची पाठ्यपुस्तके शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे नियोजन 'बालभारती'ने केले आहे.



राज्यात २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीची पाठ्यपुस्तके राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या (एनसीईआरटी) अभ्यासक्रम आराखड्यावर आधारित असणार आहेत. परंतु, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी), महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) यांच्यातील दफ्तर दिरंगाईमुळे नव्या अभ्यासक्रमावर आधारित नव्या पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीची प्रक्रिया लांबली. परिणामी आता राज्यातील शाळा १५ जूनपासून सुरू होत असल्या तरी इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके मिळण्याबाबत साशंकता निर्माण झाली आहे. नव्या अभ्यासक्रमांची सर्व माध्यमांची सर्व पाठ्यपुस्तके मिळण्यासाठी जूनअखेर उजाडणार आहे.

राज्यात शालेय अभ्यासक्रमात नव्याने बदल झाल्यानंतर टप्प्याटप्प्याने बालभारतीमार्फत पाठ्यपुस्तकांची निर्मिती केली जाते. परंतु यंदा बालभारतीच्या कारकिर्दीत प्रथमच एका वर्षी चार इयत्तांची पाठ्यपुस्तके नव्याने येत आहेत.

त्याचबरोबर, पाठ्यपुस्तकांच्या निर्मिती प्रक्रियेत अभ्यासक्रमाला मान्यता मिळणे, विविध पातळ्यांवर होणारे गुणवत्ता परीक्षण, अंतिम मान्यता याला विलंब झाल्याने प्रत्यक्ष छपाईचे काम उशिराने सुरू झाले. त्यामुळे यंदा नियमितपणे शाळा सुरू झाल्या तरी संबंधित इयत्तांचे वर्ग पाठ्यपुस्तकांविनाच भरणार असल्याचे वास्तव आहे.

### ३० जूनपूर्वी पाठ्यपुस्तके

बालभारतीच्या कारकिर्दीत यंदा पहिल्यांदाच एकाच वर्षी चार इयत्तांची नव्या अभ्यासक्रमावर आधारित पाठ्यपुस्तके येत आहेत. इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीच्या पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीसंदर्भातील मंजुरी टप्प्याटप्प्याने मिळत गेली. त्यानुसार पाठ्यपुस्तकांच्या छपाईचे काम सुरू झाले. छपाई पूर्ण झालेली पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याची यंत्रणा कार्यान्वित केली आहे. या चार इयत्तांची सर्व माध्यमांची, सर्व विषयांची पाठ्यपुस्तके ३० जूनपर्यंत विद्यार्थ्यांच्या हातात पडतील.

